चला स्विमिंग ला... स्विमिंग सुट, गॉगल, स्विमिंग कॅप, बरमुडा स्विमिंग लेगींग्ज टॉप, व बरेच काही
जरीवाला कापड बाजार, फोन नं. 7666510765 यशोदानगर, पाईपलाईन रोड, सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

संस्थापक के. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

महेंद्र पेढावाला रजवाडी गुजराती थाळी
हर रविवारी दालबाटी व चुरमा व दररोज आमरसचा बेत
हापुस आमरस 400/- किलो
ट्रेन पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टी सुविधा उपलब्ध.
कापड बाजार, अहिल्यानगर. पार्सल सुविधा उपलब्ध...

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. १५.०५.२०२५ | अंक नं. ३८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

10वी तील यशस्वी विद्यार्थ्यांसाठी गोल्डन ऑफर
चेन व अंगठी खरेदीवर मिळवा आपल्याला मिळालेल्या टक्केवारीएवढी मजुरीत सूट*
योजना 16 मे 2025 पर्यंत लागू.
योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या मुळ मार्कशीटची झेरॉक्स प्रत स्वतः घेवून येणे आवश्यक.
चंदुकाका ज्वेल्स सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# नगरमधील बसस्थानके बनलेत गुन्हेगारांचे अड्डे

## दररोज दागिने, रोकड जातेयं चोरीला; पोलिसांचे होतेयं दुर्लक्ष

नगर - नगर शहरातील जुन्या बसस्थानकासह स्वस्तिक चौकातील पुणे बसस्थानकात गेल्या काही दिवसांमध्ये पाकिट चोरी, दागिने, पर्स, चोरीच्या घटना वाढल्या आहेत. या शिवाय विविध प्रकारचे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांचा या ठिकाणी असलेला मुक्त वावर पाहता ही बस स्थानके गुन्हेगारांचे अड्डे बनले आहेत. चोरटे सक्रिय झाले असताना आणि दररोज चोऱ्या करत असताना पोलिसांकडून मात्र अद्यापही तपासात निष्क्रियता दाखवली जात आहे.

नगर शहर हे उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भ मराठवाड्याला जोडणारे मध्यवर्ती ठिकाण असल्याने शहरातून दररोज हजारो प्रवासी प्रवास करत असतात. जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील प्रवाशांची जुन्या बसस्थानकात तर परजिल्ह्यात जाणाऱ्या प्रवाशांची पुणे बसस्थानकात दररोज मोठी गर्दी होत असते. यात विशेषतः महिलांना एस.टी. बस प्रवाशी भाड्यात राज्य सरकारने सवलत जाहीर केलेली असल्याने एस टी बस प्रवासासाठी महिलांची गर्दी मोठ्या प्रमाणावर आहे. महिलांची गर्दी वाढण्याबरोबरच या गर्दीत बस मध्ये चढताना, उतरताना महिलांच्या गळ्यातील दागिने, पर्स मधील दागिने, पैसे चोरी जाण्याचे प्रमाणही वाढले आहे. चोरटे गर्दीत मिसळून हातसफाई करत आहेत. गेल्या काही दिवसांत या घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याने नगर मधील बस स्थानके चोरट्यांचे अड्डे बनले असल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

### प्रवासी महिलेचे ७ तोळे दागिने गेले चोरीला

गेल्या आठवडा भरात ३ महिला प्रवाशांच्या दागिने व रोकडच्या चोऱ्या बसस्थानकात झाल्या आहेत. एसटी बस ने माळीवाडा बसस्थानक ते वाळुंज प्रवासादरम्यान चोरट्याने मंडाबाई सर्जेराव नवले (वय ५५, रा. गुरव पिंपरी, ता. कर्जत) यांच्या पर्समध्ये ठेवलेले ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र चोरल्याची घटना ११ मे रोजी सकाळी १० ते ११ वाजण्याच्या दरम्यान घडली होती. त्या पाठोपाठ १३ मे रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास पुणे बसस्थानकात सुनंदा अरुण भारस्कर (वय ३५, रा. बाबा हॉस्पिटल, दीप बंगला चौक, शिवाजीनगर, पुणे) यांनी त्यांच्या बॅगमध्ये ठेवलेले १ तोळा वजनाचे सोन्याचे पट्टी नेकलेस २ महिला चोरट्यांनी चोरले. त्यानंतर पुन्हा जुन्या बसस्थानकात १४ मे रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास एका प्रवासी महिलेच्या बॅगमधून ७ तोळे वजनाचे *(पुढील मजकूर पान २ वर)*

## बसस्थानकातील पोलीस चौकीला टाळे


माळीवाडा बसस्थानकात असलेल्या पोलिस चौकीला लागलेले टाळे दिसत आहे.

बसस्थानकात येणाऱ्या प्रवाशांच्या मालमत्तेचे व गुन्हेगारी घटनांपासून संरक्षण होण्याच्या दृष्टीने बसस्थानकात पोलीस चौकी उभारण्यात आली. परंतु या पोलीस चौकीत पोलीस कर्मचारी कधीही दिसून येत नाही. बसस्थानकात चोरीच्या अगर भांडणाच्या काही घटना घडल्यास नागरिकांना कोतवाली पोलीस ठाण्याकडे धाव घ्यावी लागते. बसस्थानकात असलेली पोलीस चौकी नेहमी बंद असल्याचे दिसते. त्यामुळे बसस्थानक परिसरात गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांना पोलिसांचा कुठलाही धाक राहिलेला नाही. परिणामी ते बिनधास्तपणे चोऱ्या करत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

WORK FROM HOME
अहिल्यानगरमध्ये आरोग्याच्या संधीचा विस्तार
PREMIUM OPPORTUNITY MEETINGS
या प्रवासात आमच्यासोबत सामील होण्यासाठी समान विचारसरणीच्या उत्साही व्यक्तींच्या शोधात आहात.
18/05/2025 | SUNDAY 09.30 AM
Venue : HOTEL YASH GRAND
Railway Station Road, Malhar Chowk, Ahilyanagar-414001
Mr.Keran Kanade (Successful Enterpreneur)
नाव नोंदणीसाठी संपर्क : 7020025541

डॉ. अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine) DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
* डोकेदुखी, मायग्रेन * फिटचे आजार, अपस्मार * हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज * तोल जाणे * व्हर्टिगो, चक्कर येणे * अर्धांगवायू, पॅरेलीसीस * विसराळूपणा * थरथर सुटणे, पार्किन्सन
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिद्ध निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

संकष्ट चतुर्थी शुक्रवार दि. १६ मे चंद्रोदय १०.२७ मि.
उपवासासाठी स्पेशल टक्कर मलाई लस्सी
कैलास उडपी लस्सी
शाखा नं. १ : शिवशक्ती अपार्टमेंट, खिस्त गल्ली, पिराजवळ, अहिल्यानगर.
शाखा नं. २ : तहसील कार्यालय समोर, टीव्ही सेंटर, सावेडी, अहिल्यानगर.
शाखा नं. ३ : पद्मावती पेट्रोल पंपाजवळ, नगर मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर.

इंडो आयरिश हॉस्पिटल
तपोवन रोड, सावेडी, अहिल्यानगर. फोन 0241-2423336 मो. 9130423336 * 9860310001
तर्फे मोफत सर्वरोग तपासणी
• सर्व तपासणीवर ५०% पर्यंत सवलत
Star Health, Sbi General Insurance, Oriental Health Insurance & All Tpa, National Insurance, Reliance Insurance Company, Universal Sampo, Manipal Cigna, IFFCO TOKIO, Tata Aig General Insurance, ICICI Lombard, Bajaj Allianz, HDFC ERGO, Medi Assist, Future Genrali
व इतर सर्व कॅशलेस इंशुरन्स उपलब्ध
उपलब्ध सुविधा
सर्व रोग निदान व उपचार
• जनरल सर्जरी (हार्निया, अपेंडीक्स व इतर सर्व शस्त्रक्रिया)
• कार्डियाक (कॅथलॅब, ॲन्जीओप्लास्टी)
• युरोलॉजी (डायलिसीस, किडनीस्टोन, प्रोस्टेट सर्जरी)
• मेडिसीन (डायबेटिस, हृदयाचे आजार, स्ट्रोक, ब्लडप्रेशर)
• ऑर्थोपेडिक (सांधेदुखी, पाठदुखी, सांधे प्रत्यारोपण)
• स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र (वंध्यत्व निवारण, वेदनाविरहीत प्रसुती)
• बालरोग व नवजात रोगशास्त्र
• ऑन्कोलॉजी (सर्जरी व किमोथेरपी)
• पॅथॉलॉजी
• रेडिओलॉजी
• सिटीस्कॅन
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना | आयुष्मान भारत योजना | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार योजना | २४ तास अपघातांसाठी व ॲम्ब्युलन्स सुविधा उपलब्ध

इम्पोर्टेड टेबल टॉप वॉश बेसीन उपलब्ध..
10% to 50% Discount
* एकदा अवश्य भेट द्या.
* नियम व अटी लागू.
मे. अभय सेल्स कॉर्पोरेशन हार्डवेअर
सर्वोदय कॉलनी समोर, गजानन हॉस्पीटल शेजारी, सातभाई मळा, दिल्ली गेट, अहमदनगर
9145008009 / 9822542011

MAHA DISCOUNT offer
An ISO 9001:2015 Certified DiSHA COMPUTER INSTITUTE
in Any Course Just 1800/-
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY, GST, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING, C++, CANVA, CHAT GPT, BANKING, TAXATION
Delhi Gate Branch 9371051769 | Old ST stand Branch 9371151769 | Pipeline Branch 7447761769

जिल्ह्यातील सर्वप्रथम प्रशस्त आरोग्य मंदिरात.. सर्वोत्तम, उच्चशिक्षित कर्करोग शस्त्रक्रियातज्ञ आता आपल्या सेवेत उपलब्ध...
डॉ. अद्वैत अरुण वैद्य
M.B.B.S., M.S. (General Surgery) M.Ch. (Surgical Oncologist)
CANCER
थायरॉईड, स्तनाचे, गर्भाशयाचे पिशवी, गर्भाशयाचे मुखाचे, प्रोस्टेट ग्रंथी, मुत्रपिंड व मुत्राशयाचे कॅन्सर तसेच शरितातील सर्व प्रकारचे कॅन्सीरपिडीत गाठी इ. व्याधींवर निदान, उपचार व अद्ययावत शस्त्रक्रिया...
कॅन्सर विशेषज्ञ डॉ. अद्वैत वैद्य
सोमवार ते शनिवार उपलब्ध.. वेळ : दुपारी १ ते ५
त्वरीत निदान व योग्य उपचारांसाठी संपर्क साधा..
सर्व प्रकारच्या व्याधींवर अद्ययावत सेवा सुविधा उपलब्ध...
सर्व प्रमुख कंपन्यांसाठी कॅशलेस सुविधा
एशियन नोबल हॉस्पिटल प्रा लि.
प्रेमदान चौक, मनमाड रोड, अहिल्यानगर
0241 - 2421290-91-92, 0241 - 2421911-12-13
* महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत कर्करोगावरील शस्त्रक्रिया केल्या जातील.*
संपर्क : 86055 52266

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

# राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी फेर प्रभागरचना करा; निवडणूक आयोगाचे सरकारला निर्देश

मुंबई – स्थानिक स्वराज्य संस्थांच्या रखडलेल्या निवडणुका येत्या चार महिन्यांत घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर आता राज्य निवडणूक आयोग या निवडणुका घेण्यासाठी सक्रिय झाला आहे. निवडणुका घेण्यासाठी महापालिका, नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या प्रभाग रचना तयार करण्याची कार्यवाही तातडीने सुरू करण्याचे आदेश आयोगाने राज्य सरकारला दिले. तसेच, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्या गट आणि पंचायत समित्यांच्या गणांची रचना करण्याचे आदेशही दिले आहेत. त्यामुळे राज्य सरकारला पालिकांची प्रभाग रचना, तसेच गट आणि गणांची फेररचना करण्याची प्रक्रिया सुरू करावी लागणार आहे.

सुरुवातीला कोरोनाचे संकट, रखडलेली प्रभाग रचना आणि नंतर ओबीसींच्या राजकीय आरक्षणाच्या मुद्यामुळे तीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबलेल्या आहेत. २९ महानगरपालिका, २५७ नगरपालिका, २६ जिल्हा परिषदा आणि २८९ पंचायत समित्यांचा गाडा प्रशासकच हाकत आहेत. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला आदेश देत पुढील चार आठवड्यांत निवडणुका घोषित करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, पूर्ण प्रक्रिया चार महिन्यांत संपवावी, असे आदेशही सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यावर राज्य निवडणूक आयोगाने कार्यवाही सुरू केली आहे. आयोगाने राज्य सरकारला पत्र पाठवून निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यासाठी महापालिका, नगर परिषदा आणि नगर पंचायतींची प्रभाग रचना करण्याचे आदेश बुधवारी जारी केले. तसेच, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांचीही गट आणि गण यांची रचना करण्यास सांगितले आहे.

ओबीसी आरक्षणासंदर्भात बांठिया आयोगाच्या पूर्वीची स्थिती असणार आहे. त्यामुळे या निवडणुकांमध्ये ओबीसींचे पूर्ण आरक्षण लागू असणार आहे. प्रभाग, गट आणि गणांची रचना झाल्यानंतर आरक्षणाची सोडत काढली जाणार आहे. त्यामुळे आता खऱ्या अर्थाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल वाजणार असून, राज्यात निवडणुकांची रणधुमाळी सुरू होणार आहे.

# बाहेरगावी गेलेल्या कुटुंबाचे घर फोडून दागिन्यासह रोकडची चोरी

नगर – शाळेला सुट्टी असल्याने कुटुंबासह बाहेरगावी गेलेल्या शिक्षकाचे घर फोडून अज्ञात चोरट्यांनी सोन्या चांदीच्या दागिन्यासह रोख रक्कम चोरुन नेल्याची घटना सावेडी उपनगरातील भिस्तबाग जवळील कसबे वस्ती येथे १३ मे रोजी दुपारी ५ ते १४ मे रोजी सकाळी ११ वाजण्याच्या दरम्यान घडली.

याबाबत विष्णू रघुनाथ बारगळ (वय ३८, मूळ रा. पिंपळगाव माळवी, ता. नगर. हल्ली रा. लक्ष्मी निवास, हनुमान मंदिर शेजारी, कसबे वस्ती, भिस्तबाग) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे कापूरवाडी हायस्कूल येथे शिक्षक असून शाळेला सुट्टी असल्याने ते कुटुंबासह १ मे रोजी दुपारी ३ वाजता त्यांच्या मूळ गावी पिंपळगाव माळवी येथे गेले. त्यानंतर फिर्यादी हे १३ मे रोजी दुपारी नगर येथील घरी आले. त्यावेळी त्यांच्या घरातील सर्व साहित्य व वस्तू व्यवस्थित होते. त्यानंतर फिर्यादी काम आटोपुन सायंकाळी पुन्हा माळवी पिंपळगाव येथे गेले.

दुसऱ्या दिवशी ते सकाळी ११ वाजता पुन्हा नगरमधील घरी आले असता त्यांना घराच्या दरवाजाचा कडी कोयंडा तुटलेला दिसला व घर उघडे दिसले. तेव्हा त्यांनी आत प्रवेश करुन पाहिले असता घरातील सामान उचकलेले व अस्ताव्यस्त फेकलेले दिसले. त्यांनी बेडरुम मधील कपाटात ठेवलेल्या मौल्यवान वस्तू व रोख रक्कम यांची तपासणी केली असता, त्यांना कपाटातील १५ हजार रुपये किमतीचे विविध वजनाचे लहान मुलांचे सोन्याचे दागिने, ४ हजार रुपये किमतीचे ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मनी व कानातील टॉप्स, १ हजार रुपये किमतीच्या चांदीच्या साखळ्या व ५ हजार रुपये रोख रक्कम असा ऐवज चोरीला गेल्याचे दिसून आले. याप्रकरणी विष्णू बारगळ यांनी तोफखाना पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बी. एन. एस.कलम ३३१ (१) (४), ३०५ (ब) प्रमाणे घरफोडीचा गुन्हा दाखल केला आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन

संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१



### सहकारातून आर्थिक समृद्धी

आपल्या नगर जिल्ह्यात पुण्या–मुंबईसम कॉर्पोरेट व कारखानदारीची मोठी परंपरा नसली तरी सहकाराच्या क्षेत्रातून जिल्ह्याने मोठी आर्थिक भरभराट केली आहे.

पद्मश्री विठ्ठलराव विखेंनी आशियातला पहिला साखर कारखाना काढला आणि सहकाराची ही गंगोत्री हळूहळू संपूर्ण जिल्ह्यात झिरपत गेली.

शेअर मार्केटच्या दुनियेत आपल्या नगरीचा वाटा, हिस्सा म्हणा वा गुंतवणुकीचा नंबर पहिल्या १० मध्ये असावा असे म्हणतात. पण सहकाराच्या अग्रेसर या महाराष्ट्रात आपले अहिल्यानगर नक्कीच आघाडीवर आहे.

नगर जिल्ह्यात आजच्या घडीला सुमारे ११०० नागरी–ग्रामीण पतसंस्था, २०५ पगारदार संस्था, १७ सहकारी बँका आहेत. तसेच नवनवीन व आशादायक महिलांचे बचतगट उभारले जात आहेत.

आनंदाची गोष्ट म्हणजे वरील सर्व सहकारी आर्थिक संस्थेत तब्बल २० लाखांपर्यंतचे सभासद, ठेवीदार साधारणतः ९२ हजार कोटींच्या ठेवी विश्वासाने ठेवतात ही फार मोठी गोष्ट आहे. मध्यंतरी काही सह. बँका, मल्टीस्टेट पतसंस्थांमधील आर्थिक घोट्याळ्यानंतरही ठेवीदारांचा सहकारी आर्थिक संस्थांवरील विश्वास विलक्षण व लक्षणीय आहे. मागील ३ वर्षात तब्बल ५९ हजार कोटींच्या ठेवी सहकारात वाढल्या आहेत.

सामान्यतः राष्ट्रीय बँकांपेक्षा अधिक व्याज, माहितीतले संचालक व कर्मचारी, त्वरित उपलब्धता इ. मुळे हे शक्य झाले तरी या संचालक व कर्मचाऱ्यांनी ठेवीदारांच्या विश्वासास तडा जाऊ न दिल्यास यातूनही जिल्ह्याची समृद्धी शक्य आहे.

# मुदत संपल्यानंतरही ठेवींची रक्कम देण्यास टाळाटाळ करत नगरमधील पतसंस्थेकडून ठेवीदारांची लाखोंची फसवणूक; संचालक मंडळासह १२ जणांवर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

नगर – ठेवीदारांकडून मुदत ठेव म्हणून घेतलेली रक्कम व त्यावरील व्याज मुदत संपल्यानंतरही देण्यास टाळाटाळ करत ठेवीदारांची ४२ लाख ७ हजार ७१० रुपयांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळासह १२ जणांवर कोतवाली पोलिस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत ठेवीदार अमेय रमेश मुदकवी (वय ५०, रा. गृहशिल्प सोसायटी, बागरोजा, दिल्ली गेट, अ.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. पूर्णवाद नागरी सहकारी पतसंस्था ही जळगाव येथील आहे. या पतसंस्थेने काही वर्षांपूर्वी नगर शहरात जुन्या कोर्टासमोरील करण कोर्ट अपार्टमेंट येथे शाखा सुरु केली होती. या शाखेत फिर्यादी मुदकवी यांचे वडील रमेश विष्णुपंत मुदकवी यांचे व त्यांची आई उज्वला यांचे बचत खाते होते. फिर्यादी व त्यांचा भाऊ निखिल यांनी सर्वांनी मिळून बचत केलेली रक्कम या शाखेत मुदत ठेव म्हणून जमा केली होती. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांचे खाते हे फिर्यादी यांच्या नावावर वारसा हक्काने आले. ५ नोव्हेंबर २०२२ ते १९ डिसेंबर २०२४ दरम्यान फिर्यादी यांची आई व भाऊ या सर्वांनी मिळून पतसंस्थेत ४२ लाख ७ हजार ७१० रुपये एवढी रक्कम गुंतवणूक केली. या गुंतवणुकीच्या मुदत ठेव पावत्या पतसंस्थेने फिर्यादी यांना दिल्या. ठेवीची मुदत संपल्यानंतर फिर्यादी यांनी त्यांची गुंतवणूक केलेली रक्कम पतसंस्थेकडे मागितली असता पतसंस्थेच्या संचालकांनी तुम्हाला देण्याकरिता पुरेशी रक्कम उपलब्ध नाही. पैसे उपलब्ध झाल्यानंतर तुमची रक्कम तुम्हाला व्याजा सहित देण्यात येईल असे सांगितले. तसेच त्यांना त्यांची सर्व रक्कम रिकअरिंग डिपॉझिटमध्ये गुंतवण्याची गळ घातली व त्याची मुदतही संपली. त्यामुळे फिर्यादी व इतर ठेवीदार पैसे मागणेकरिता पतसंस्थेत गेले असता ८ दिवसात पैसे देऊ असे सांगून त्यांना परत पाठवले. त्यानंतर ठेवीदारांनी पतसंस्थेकडे वारंवार पैशाची मागणी केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देऊन पैसे देण्यास टाळाटाळ केली. यावरुन पतसंस्थेचे संचालक यांनी फिर्यादी व इतर ठेवीदारांचा विश्वास संपादन करून त्यांचे ४२ लाख ७ हजार ७१० रुपये एवढी मुदत ठेव रक्कम व्याजासहित न देता फसवणूक केली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी अमेय मुदकवी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सत्यशील अविनाश अकोले, अनुप सत्यशील अकोले, शिल्पा शाम अकोले, शीतल सत्यशील अकोले, श्याम अविनाश अकोले (रा. पूर्णवाद नगर, रिंग रोड, जळगाव), बंडू गणेश लोखंडे (रा.आंबेडकर नगर, सावदा, ता. रावेर, जि जळगाव), महेंद्र मनोहरलाल शर्मा (रा. आठवडे बाजार, बुऱ्हाणपूर रोड, रावेर, जि जळगाव), जितेंद्र कृष्णमूर्ती कुलकर्णी (रा. सहकारनगर, सावेडी, अ.नगर), नितीन शंकर राणे, विजय शंकर राणे (दोघे रा.क्रांती चौक, सावदा, ता. रावेर जि.जळगाव), नामदेव पांडुरंग कोळी (रा. विठ्ठलनगर, जळगाव), महेश सुधाकर कुलकर्णी (रा. गोडाऊन जवळ, केडगाव, अ.नगर) यांच्या विरुद्ध बी. एन. एस. कलम ३१६, ३१८, ३३६, ६१, ३ (५) सह मुंबई पोलिस कायदा कलम ३ व ४ प्रमाणे गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड हे करीत आहे.

## मुकुंदनगर येथून मोपेडची चोरी

नगर – रस्त्याच्या कडेला हॅण्डेल लॉक करुन लावलेली सुझुकी कंपनीची एक्सेस मोपेड कोणीतरी अज्ञात चोरट्याने नजर चुकवून चोरुन नेल्याची घटना मुकुंदनगर येथील बडी मज्जिद जवळ जे. बी. किराणा दुकाना समोर १२ मे रोजी सकाळी १० ते १३ मे रोजी दुपारी २.३० या कालावधीत घडली. याप्रकरणी सोहेल रशीद खान पठाण (वय ३५ रा. बडी मज्जिद जवळ, मुकुंदनगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन भिंगार कॅम्प पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध बी. एन. एस. कलम ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# नगर अर्बन बँक घोटाळा प्रकरणातील आरोपी अद्याप मोकाट

## तात्काळ कारवाई करावी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन

नगर – नगर अर्बन (मल्टीस्टेट) को–ऑप. बँक (अहमदनगर) अहिल्यानगर ही नगर जिल्ह्यातील गोरगरीब जनतेची व व्यापाऱ्यांची हक्काची बँक होती. १०० वर्षांच्या या बँकेवर सत्तेची मस्ती चढलेल्या काही महाभागांनी ताव मारून बँकेतील सत्ता हस्तगत केली. बँक ताब्यात आल्यानंतर स्वतःसाठी व स्वतःच्या नजीकच्या लोकांसाठी बँकेत घोटाळे सुरु केले. या घोटाळ्यांमध्ये बँकेतील गोरगरीब जनतेचा पैसा लुटला व बँक बंद पाडली. बँकेत घोटाळा करणाऱ्या १०५ आरोपींची नावे व त्यांची संपूर्ण माहिती पोलीस प्रशासनाकडे आहे. तरी या सर्व आरोपीवर कडक कारवाई करावी, अशी मागणी बँकेचे सभासद राजेंद्र चोपडा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात राजेंद्र चोपडा यांनी म्हटले आहे की, नगर अर्बन (मल्टीस्टेट) को–ऑप. बँकेमधील २९१ कोटींच्या झालेल्या आर्थिक घोटाळ्याबाबत आपणास वेळोवेळी पत्राद्वारे माहिती दिलेली आहे. चेअरमन, संचालक मंडळासोबत केलेला बँकेचा आर्थिक घोटाळा जगजाहीर आहे. यात बँकेचे काही वरिष्ठ अधिकारीही सहभागी होते. मुख्यमंत्री, आपण ६ मे रोजी अहिल्यानगर शहरात आला होतात. यावेळी बँक घोटाळा करणारे आरोपी आपल्यासोबत फिरत होते. इतका मोठा आर्थिक घोटाळा करून बँक बंद पाहून देखील आरोपी वरिष्ठ भाजप पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने मोकाट फिरताना संपूर्ण नगर शहर त्यांना पाहत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नीती आहे कि, ना खाऊंगा ना खाने दूंगा. परंतु महाराष्ट्र सरकार मधील काही मंत्र्यांच्या छत्रछायेमुळे बँक बुडवणाऱ्या आरोपींवर काहीही कारवाई होत नाही.

बँक घोटाळा करणाऱ्या १०५ आरोपींची नावे व त्यांची संपूर्ण माहिती पोलीस प्रशासनाकडे आहे. तरी देखील महाराष्ट्र पोलीस व अहिल्यानगर जिल्हा पोलीस प्रशासन घोटाळा करणाऱ्या आरोपींवर कुठल्याही प्रकारची कारवाई करत नाहीत. हे का करत नाहीत तर पोलीस प्रशासनावर देखील भाजप वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचा व सरकार मधील मंत्र्यांचा दबाव आहे म्हणून काही कारवाई करत नाहीत.

मुख्यमंत्री, राज्याचे गृह खाते आपल्याकडेच आहे आपण स्वतः या गंभीर विषयामध्ये लक्ष देऊन पोलीस प्रशासनाला सूचना करून आरोपींवर तात्काळ कारवाई करण्याचे आदेश द्यावेत. तसेच महोदय या गंभीर प्रकरणावर चर्चा करण्यासाठी बँक बचाव समितीला आपला वेळ मिळावा, अशी आपणास बँक बचाव समिती व माझ्याकडून विनंती आहे.

# मागील भांडणाच्या कारणावरुन एकाला धारदार वस्तूने मारहाण

नगर – मागील भांडणाचा मनात राग धरुन एकास शिवीगाळ करुन काहीतरी टणक वस्तूने मारहाण करुन जखमी केले व मारुन टाकण्याची धमकी दिल्याची घटना नगर तालुक्याची जेऊर येथील बहिरवाडी रोडवर, कपड्याच्या दुकानासमोर १३ मे रोजी रात्री ९.३० वाजता घडली.

याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात विकास अंकुश काळे (वय ४३, रा. काळे वस्ती, बहिरवाडी, ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की फिर्यादी हे बहिरवाडी रोडवरील वाघ यांच्या दुकानासमोर उभे असताना तेथे अशोक श्रीमंत दारकुंडे (रा. बहिरवाडी ता. नगर) हा आला. त्याने मागील एक वर्षाच्या भांडणाच्या कारणावरुन शिवीगाळ करीत काहीतरी धारदार वस्तूने फिर्यादीच्या उजव्या हातावर मारुन जखमी केले. तसेच काचेची बाटली फोडून तुला मारुन टाकेल अशी धमकी दिली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात विकास काळे यांनी दिलेल्या फिर्यादी वरून अशोक दारकुंडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# नगरमधील बसस्थानके बनलेत गुन्हेगारांचे अड्डे

(पान १ वरुन)

सोन्याचे दागिने चोरीला गेले आहेत.

याबाबत प्रियंका अविनाश सोनवणे (वय २४, रा. रेणुकानगर, बोल्हेगाव, अ.नगर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या त्यांच्या नातेवाईकांचे पाथर्डी येथे लग्न असल्याने त्यांची आई रुख्मिमी खेडकर यांच्यासह पाथर्डी येथे जाण्यासाठी माळीवाडा बसस्टॅन्ड येथे गेल्या. लग्नात घालण्यासाठी त्यांनी त्यांचे दागिने सोबत घेऊन ते त्यांच्याकडील बॅगमध्ये ठेवलेले होते. बसस्थानक येथून पाथर्डीला जाणाऱ्या एसटी बसमध्ये बसण्यासाठी गर्दीतून आत प्रवेश असताना फिर्यादीच्या बॅगेला हिसका बसल्याचे जाणवले. त्यावेळी फिर्यादी यांनी बॅग पहिली असता चोरट्याने बॅगेच्या खालच्या बाजूस कटर मारल्याचे दिसले. त्यानंतर फिर्यादी यांनी बॅग उचकून पहिली असता बॅगेत ठेवलेले साडेचार तोळे वजनाचे सोन्याचे पट्टी गंठण, दीड तोळे वजनाचे सोन्याचे पट्टी नेकलेस, एक तोळा वजनाचे कानातले सोन्याचे झुंबर, असे ७ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याचे दिसून आले. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात प्रियंका सोनवणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चोरट्याविरुद्ध भा. न्या. सं. कलम ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

### महिला प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण

राज्य सरकारने महिलांसाठी बस प्रवास तिकिटात सवलत जाहीर केल्या पासून बसने प्रवास करण्यासाठी महिलांची नेहमीच गर्दी होत असते. या शिवाय सध्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या, लग्नसराई सुरु असल्याने शहरातील तीनही बस स्थानकावर महिलांची मोठी गर्दी पहायला मिळत आहे. प्रत्येक महिलेकडे काही ना काही दागिने असतातच. त्यामुळे या दागिन्यांवर डल्ला मारण्यासाठी अनेक महिला चोरट्यांच्या टोळ्या सक्रीय झालेल्या आहेत. बसस्थानक परिसरात गर्दीत बस मध्ये जागा धरण्याकरिता महिलांची धांदल उडत असल्याने या संधीचा फायदा घेत चोरटे महिला प्रवाशांना लक्ष्य करुन हात सफाई करतात. या वाढत्या चोऱ्यांमुळे महिला प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### यापूर्वीच्या पोलिस निरीक्षकांच्या उपाययोजना पडल्या बंद

कोतवालीचे तत्कालीन पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी त्यांच्या काळात बसस्थानक परिसरातील चोऱ्या रोखण्यासाठी विविध उपाययोजना केल्या होत्या. बसस्थानकात प्रवाशांना सावधगिरीच्या सूचना देण्यासाठी ध्वनीक्षेपक यंत्रणा बसविली होती. तसेच दोन्ही बसस्थानकात साध्या वेशात महिला व पुरुष कर्मचारी नियुक्त केले होते. या उपाययोजनांमुळे बसस्थानकातील चोऱ्यांना काहीसा आळा बसला होता. मात्र पो.नि. यादव यांची बदली झाली आणि या उपाययोजनाही बंद पडल्या आहेत. परिणामी बसस्थानकावर पुन्हा चोऱ्या वाढल्या आहेत. या चोऱ्या रोखण्यासाठी सध्याचे पो.नि. प्रताप दराडे आता काय उपाययोजना करतात हे पाहणे औत्सुक्याच ठरणार आहे.

# तेरा कोटी पंच्याहत्तर लाख रुपये किंमतीचा अंमली पदार्थांचा साठा पोलिसांनी केला जप्त



जप्त केलेल्या अंमली पदार्थांच्या साठ्यासह पोलिस.

नगर – श्रीरामपूर येथील एमआयडीसीमधील एका गोदामातून १३ कोटी ७५ लाख ४१ हजार रुपये किंमतीची २१ गोण्या पांढऱ्या रंगाची पावडर व खडे घेवून निघालेला टेम्पो श्रीरामपूर शहर पोलिसांनी दिघी शिवारात पकडला आहे. ही पावडर अल्प्राझोलम हा अंमलीपदार्थ तयार करण्यासाठी वापण्यात येत असल्याचे समोर आले आहे. फॉरेन्सिक तपासणीसाठी या पावडरचे नमुने पोलिसांनी घेतले आहेत. १४ मे रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास ही कारवाई करण्यात आली.

श्रीरामपूर येथील एमआयडीमधून एक टेम्पो ड्रग सदृश पावडर घेवून जाणार असल्याची माहिती पोलीस उपअधिक्षक डॉ. बसवराज शिवपुजे यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशनचे पो. नि. नितीन देशमुख यांना ही माहिती कळविली. त्यानंतर पो.नि. देशमुख यांनी तातडीने पथकासह एमआयडीसी परिसरात तपासणी सुरु केली. थोड्या वेळात दिघी शिवारात एक टेम्पो (क्र.एम एच २० बी टी ०९५१) पोलिसांनी पकडला. त्यात २१ गोण्या पांढरा रंग असलेली पावडर व काही खडे आढळून आले. टेम्पो चालक मिनिनाथ विष्णू राशिनकर (वय ३८, रा. धनगरवाडी, ता.राहाता)यास ही पावडर कोठून आणली याची माहिती विचारली असता त्याने श्रीरामपूर एमआयडीसी मधील गोदामातून हा माल उचलल्याची माहिती दिली. तसेच सदर खडे हे अल्प्राझोलमचे असून पावडर ही अल्प्राझोलम बनविण्यासाठीचा कच्चा माल असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी नगरमधून फॉरेन्सिक तज्ञांना बोलावले. त्यांनी पावडरची तपासणी करून सदर माल हा अल्प्राझोलम असून तो अंमलीपदार्थ असल्याचे सांगितले.

दौंड (जि.पुणे) येथील एका कंपनीमध्ये काही महिन्यांपूर्वी नोकरीस असलेल्या दौंड येथील विश्वनाथ कारभारी शिपनकर याने नोकरी सोडून चार महिन्यापूर्वी श्रीरामपूर एमआयडीसी मध्ये भाड्याने घेतलेल्या गोदामातून ही पावडर उचलण्यात आली आहे. त्यामुळे पोलिसांनी सदर १३ कोटी ७५ लाख ४१ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करत दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

## वसंतराव हिंगोलीकर यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर – संग्रामनगर, बीड बायपास येथील रहिवासी वसंतराव वैजनाथराव हिंगोलीकर (८८) यांचे १४ मे रोजी सकाळी पहाटे ३.३० वाजता निधन झाले.

त्यांच्यावर सकाळी ११ वाजता प्रतापनगर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अरणगाव येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व्हावे : सभापती प्रा.राम शिंदे यांना निवेदन

नगर – अरणगाव येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व्हावे. या मागणीचे निवेदन विधान परिषदेचे सभापती नामदार प्रा.राम शिंदे यांना अरणगाव ग्रामस्थ व कार्यकर्ते यांच्यावतीने देण्यात आले. याप्रसंगी भारतीय जनता पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य वसंत लोढा, पतसंस्था फेडरेशनचे तालुकाध्यक्ष किसनराव लोटके, शिवसेना (शिंदे गटाचे) उपजिल्हाप्रमुख आनंदराव शेळके, पोपटराव पुंड, गोरख कल्हापूरे, शिवाजी पुंड, अंबादास कल्हापूरे, दादाभाऊ शेळके आदी उपस्थित होते.

अरणगाव हे गाव अवतार मेहेरबाबा यांच्या कार्यामुळे प्रसिद्धीस आलेले गांव आहे. अहिल्यानगर शहरापासुन दौंड रोडवर बायपास वळण रस्त्याला लागुन ६ किलो मिटर अंतरावर आहे. त्याच शिवारात अंतरराष्ट्रीय दर्जाचे VRDE ही संशोधन संस्था सध्या कार्यरत आहे. तसेच पुणे विद्यापीठाची शाखा या गावाची प्रगती होईल.



अरणगाव येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व्हावे असे निवेदन विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांना देण्यात आले.

बाबुर्डी घुमट येथे एक किलोमिटर अंतरावर आहे. रहदारीसह ईतर सर्व सुविधांचा दृष्टीने हे गाव योग्य असे आहे. या गावामध्ये ब्रिटीश काळापासुन इंडीयन रेड क्रॉस सोसायटीने चालविलेले टि.बी. शानेटोरीयम हॉस्पीटल चालवले होते. सध्या ते हॉस्पिटल बंद आहे. त्या संस्थेची जागा ९ हेक्टर ८९ आर एवढी जवळ जवळ २५ एकर जागा बायपास रोडला लागुन आहे. त्या जागेवर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्याला जोडून सरकारी दवाखाना ऐवढे सगळे होऊ शकते. असे आम्हाला वाटते.

आपण मागणी केल्यास इंडीयन रेड क्रॉस सोसायटी ही जागा शासनाला देऊ शकते. अरणगाव येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाल्यास संपूर्ण जिल्ह्याला याचा फायदा होईल. तसेच अरणगाव

# गृहिणी

## आरोग्य

### हृदयरोग टाळण्यासाठी...

सेलेनियम हे थायरॉईड ग्रंथीचे योग्यरित्या कार्य करण्यास मदत करणारे सेलेनोप्रोटीन बनवण्यासाठी आवश्यक असलेले सूक्ष्म पोषक तत्व आहे. हे खनिज आयोडीनचे थायरॉईड संप्रेरकांमध्ये रूपांतर करण्यास मदत करते, जे शरीराच्या अनेक कार्यांसाठी आणि थायरॉईड संप्रेरक चयापचय नियंत्रित करण्यासाठी महत्वाचे असतात. थायरॉईड ग्रंथी शरीरात सर्वात जास्त सेलेनियम साठवते. ब्राझील नट्स, सूर्यफूल बियाणे, शिताके मशरूम, अंडी, कोंबडीचे स्तन, यलोफिन टूना, सार्डिन, हॅलिबट, ऑयस्टर, कोळंबी यामध्ये मोठ्या प्रमाणात सेलेनियम आढळते. सेलेनियम सी-रिॲक्टिव्ह प्रोटीन, जळजळ आणि हृदयरोगासाठी जोखीम घटक कमी करते. त्याचप्रमाणे कर्करोगही प्रतिबंधीत करते. सेलेनियम हे तुमच्या शरीराला चांगल्या आरोग्यासाठी आवश्यक असलेले एक महत्त्वाचे खनिज आहे. ते थायरॉईड संप्रेरकांच्या कार्यात, डीएनए तयार करण्यात आणि तुमच्या शरीराचे नुकसान आणि संसर्गापासून संरक्षण करण्यास मदत करते.

## पाककला

### स्ट्रॉबेरी बनाना स्मूधी

**साहित्य :** १ केळी, ५ स्ट्रॉबेरी, १/२ कप दूध, १/८ टीस्पून चिया सीड, आवडीनुसार साखर, स्ट्रॉबेरी सिरप,

**कृती :** स्ट्रॉबेरी स्वच्छ धुवून पुसून कट करून घ्यावे केळी पण कट करून घ्यावे. चिया सीड स्वच्छ धुवून भिजत घालून ठेवावी. मिक्सरमध्ये वाटून घ्यावे मग त्यात दूध घालून पुन्हा एकदा मिक्सरमध्ये फिरवून घ्यावे. यानंतर वाटी मध्ये किंवा ग्लास मध्ये चिया सीड घालावे. त्यात स्मूधी घालून वरून एक स्ट्रॉबेरी कट करून घालून सर्व्ह करावे.

## वास्तू

### मुख्य प्रवेशद्वार

✻ घराचे मुख्य दार नेहमी स्वच्छ ठेवा. रात्रीच्या वेळीही मुख्य प्रवेशद्वारावर पुरेसा प्रकाश असावा.

✻ शक्य असल्यास, प्रवेशद्वारावर थोडा उंच लाकडी उंबरठा बनवा. ज्यामुळे बाहेरचा कचरा आत येणे थांबेल. कचऱ्यामुळे वास्तुदोषही वाढतात.

✻ मुख्य प्रवेशद्वारावर गणेशाची मूर्ती किंवा चित्र किंवा स्टिकर इत्यादी लावता येतात. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही दारावर ओम देखील लिहू शकता. दारावर शुभ चिन्हे बनवल्याने घरावर देवी-देवतांचे आशीर्वाद राहतात.

✻ घराभोवती जर कोणतेही कोरडे झाड किंवा बुंधा असेल तर ते ताबडतोब काढून टाकावे. यामुळे वास्तुदोष वाढतात.

## सल्ला

✻ उन्हाळ्यात स्वयंपाक करताना गरम वाफ बाहेर काढण्यासाठी चिमणी आणि एक्झॉस्ट फॅनचा वापर करावा.

✻ शक्य असल्यास, स्वयंपाकाचा वेळ कमी करण्याचा प्रयत्न करा. उदा. जास्त वेळ लागणाऱ्या पदार्थांची तयारी आधीच करा.

## सौंदर्य

✻ केस धुतल्यानंतर ते असेच बांधून ठेवण्यापेक्षा कंगव्याने केस विंचरून केसातील गुंता सोडवून घ्यावा. केसातील गुंता वेळीच यामुळे केस एकमेकांत अडकून तुटत नाहीत. त्यामुळे केस धुतल्यानंतर सर्वात आधी केसांचा गुंता सोडवावा.

✻ केसांचे सौंदर्य टिकवण्यासाठी तुम्ही हेअर सीरमचा वापर करु शकता. त्याचा योग्य वापर केल्याने केस सुंदर दिसतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. १६ मे २०२५

**संकष्ट चतुर्थी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, वैशाख कृष्णपक्ष, मूळ १६।०८, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ४१ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** दिवस अनुकूल व महत्वाचा असेल. आपले अडकेलेले कार्ये पूर्ण होतील. आनंदाची बातमी मिळेल. विशिष्ट कार्य पूर्ण होतील.

**वृषभ :** नोकरदार व्यक्तींसाठी वातावरण अनुकूल राहील. आरोग्य देखील उत्तम राहील. कौटुंबिक सहयोग मिळेल. महत्वपूर्ण प्रश्नांचे निराकरण होईल.

**मिथुन :** व्यापारासाठी प्रवासाचे योग संभवतात. संतोषजनक स्थितीमुळे उत्साह वाढेल. प्रेयसीशी संपर्क होण्याची शक्यता आहे.

**कर्क :** वैवाहिक जीवनाच्या आनंदात वाढ होईल. लेखन कार्यात यश मिळेल. कोणतीही अर्ज देण्यासाठी उत्तम वेळ. शीघ्र अनुकूल परिस्थिती होईल.

**सिंह :** कामात किंचित अडचणी येतील पण धैर्यशील राहिल्याने कार्ये पूर्ण होतील. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. वरिष्ठांकडून कौतुक होईल. नवीन शिकण्याची संधी मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या :** मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील. आरोग्य उत्तम राहील. येणारा काळ भूतकाळातील आनंद पुन्हा आणेल. संयमाची कसोटी घेणारा हा दिवस आहे.

**तूळ :** आपल्या आत्मविश्वासाचे, जोखीम घेण्याच्या वृत्तीचे प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी नवीन मार्ग काढण्याच्या आपल्या गुणांचे कौतुक होईल.

**वृश्चिक :** एखाद्या प्रोजेक्टसाठी किंवा महत्त्वाच्या कार्यासाठी आपले प्रयत्न वाढतील. आणि यशस्वी व्हाल.

**धनु :** मित्रांचा सहयोग मिळेल. मनोबल वाढेल. तुमच्या विचारांचा प्रभाव पडेल. आपणास आज संभाषण अंगलट येईल. तणाव अडचणी राहतील. मात्र मानसिक प्रसन्नता लाभेल.


**मकर :** आज नवीन संबंध स्थापित करणे, माहितीची देवाण-घेवाण व मीटिंगच्या माध्यमातून शिकवण्याची संधी मिळेल. कार्यक्षेत्राचा विकास आणि विस्तार होईल.

**कुंभ :** आत्मविश्वासाने परिपूर्ण वाटेल आणि कोणत्याही प्रतिस्पर्धी प्रयत्नासाठी हा वेळ उत्तम आहे. तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पडेल. अधिकार क्षेत्र वाढेल.

**मीन :** अधिकारी वर्गाच्या हातात अडकलेले कामे पूर्ण होतील. मित्रांचा सहयोग मिळेल. आपल्या प्रयत्नांमध्ये इतर लोकांची मदत घेतल्याने आपले कार्य किंचित सोपे होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## फिल्मीचक्कर क्र. ११८८ सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) 'गाईड' या चित्रपटाची नायिका ५) +++ के रखवाले (चित्रपटाचे नाव) ६) नसिरुद्दीन शहा, पूनम धिल्लन, सतीश शाह, आदित्य पांचोली, मंदाकिनी यांचा एक चित्रपट ८) +++ बॉम्बे (चित्रपटाचे नाव) १०) ++ कमल (चित्रपटाचे नाव) ११) ++ क्यूं और कहां (चित्रपटाचे नाव) १२) ++ सीपाही (चित्रपटाचे नाव) १३) +++ इंडिया (चित्रपटाचे नाव) १४) +++ शेट्टी (अभिनेत्याचे नाव)

**उभे शब्द :-** २) जितेंद्र, श्रीदेवी, कादरखान यांचा एक चित्रपट गाजलेला ३) सीता और गीता, राजा जानी, आझाद, पत्थर और पायल, जुगनू, कसोटी आदी चित्रपटांची नायिका ४) एक अभिनेत्री ७) धर्मेंद्र, तनुजा, राजेंद्रकुमार, कुमकुम, रमेश देव, नझीर हुसेन, सुजितकुमार, मनमोहन यांचा चित्रपट ८) +++ जावेद (संवाद लेखकांच्या जोडीपैकी एक) ९) राजेश खन्ना, श्रीदेवी, जितेंद्र, जयाप्रदा, कादरखान यांचा एक चित्रपट १२) नितू सिंगची प्रमुख भूमिका असलेला एक चित्रपट

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** शरीराचे वजन वाढले तर व्यायाम, मनाचे वाढले तर ध्यान आणि धनाचे वाढले तर दान करावे.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### नेलकटरमध्ये २ चाकू का असतात? त्यांचा वापर काय?

दात घासणे, आंघोळ करणे आणि नखे कापणे ही आपल्या दैनंदिन जीवनातील महत्त्वाची कामे आहेत. त्याचप्रमाणे नखे स्वच्छ ठेवणे अत्यंत आवश्यक आहे कारण नखांच्या माध्यमातूनच जंतू थेट तोंडातून आपल्या पोटात जाऊ शकतात. यामुळे अनेक समस्या निर्माण होतात. कधीकधी ते अनेक रोगांसाठी कारणीभूत ठरते.

जास्त नखे चावल्याने हानिकारक जीवाणू आणि विषाणू तोंडातून बोटांपर्यंत आणि नखांपासून तुमच्या चेहऱ्यावर पसरू शकतात. यामुळे संसर्ग होण्याचा धोका वाढतो. या वाईट सवयीपासून मुक्त होण्यासाठी अनेकजण खूप प्रयत्न करतात, पण ही सवय सहजासहजी सुटत नाही.

नखे कापण्यासाठी आपण नेल कटर वापरतो. पण, नेल कटरमध्ये चाकूसारखे दोन ब्लेड असतात. पण ती कशासाठी असतात याचे उत्तर आपल्यापैकी बहुतेकांना माहीत नसेल. यामागील एक महत्त्वाचे कारण जाणून तुम्ही थक्क व्हाल.

नेल कटरमध्ये मध्यभागी दोन चाकू सारखी रचना असते ज्याचा आवश्यकतेनुसार वापर केला जाऊ शकतो. या प्रकारच्या चाकूचा वापर नखे कापण्यासाठी आणि इतर अनेक कामांसाठी केला जाऊ शकतो.

नेल कटरमध्ये दोन ब्लेड जोडल्यानंतर त्याची उपयुक्तता वाढते. तुम्ही ते कुठेही सोबत घेऊन जाऊ शकता. कारण ते खूपच लहान असते, तसेच अनेक कारणांसाठी वापरले जाऊ शकते. हे बाटलीचे झाकण उघडण्यासाठी, ड्रिलिंग करण्यासाठी आणि एखादी गोष्ट, वस्तू कापण्यासाठी केला जाऊ शकतो. आपल्यापैकी बहुतेकांकडे नखे स्वच्छ करण्यासाठी धारदार ब्लेड असलेले नेल क्लिपर असते. छोट्या गोष्टी हाताळणे हे त्याचे कार्य आहे. एवढेच नाही तर बाटलीचे झाकण उघडण्यासाठीही याचा वापर करता येतो.

अनेकदा कपड्यामध्ये छोटा धागा निघतो. त्यामुळे हा धागा तोडण्यासाठी तो अनेकदा लोक खेचतात. त्यामुळे कपड्याची पूर्ण शिलाईच उसवते. परिणामी ते कपडे खराब होतात. तुमच्याबाबतीत कधी ना कधी असं घडलं असेल. पण तुमच्या बॅगेत नेल कटर असेल तर तुम्ही धागा खेचण्याऐवजी तो नेल कटरने कापू शकता. त्यामुळे शिलाई उसवणार नाही. आणि तुम्हाला हवा तेवढा धागा कापता येऊ शकतो.

आपण कपडे खरेदी करतो तेव्हा प्रत्येक कपड्याला दोन दोन तीन तीन टॅग असतात. हे टॅग प्लास्टिक किंवा धाग्याने बांधलेले असतात. विशेष म्हणजे हा धागा अत्यंत पक्का असतो. तुम्ही हाताने कितीही तोडण्याचा प्रयत्न केला तर तो तुटत नाही. उलट धाग्याने हात कापण्याची अधिक शक्यता असते. त्यामुळे तुम्ही हा धागा कापण्यासाठी नेल कटरचा वापर करू शकता. नेल कटरने हा धागा झटक्यात कापून तुम्ही टॅग हटवू शकता.

तुम्ही बाहेर आहात आणि तुम्हाला थंड पेयाच्या किंवा एखाद्या बॉटलचं झाकण उघडायचं असेल तर कधीच ते दाताने उघडू नका. चुकूनही तशी चूक करू नका. त्यामुळे दातांना इजा होण्याची किंवा दात पडण्याची शक्यता अधिक असते. दात हलण्याची शक्यताही अधिक असते. अशावेळी तुम्ही तुमच्यासोबत नेहमी नेल कटर ठेवा. नेल कटर ओपनरचं कामही करतो. त्यामुळे तुम्ही काही सेकंदात बॉटलचं झाकण उघडू शकता. नेल कटरला एक छोटा अटॅचमेंट असतो. त्याने तुम्ही सहजपणे बाटलीचं झाकण उघडू शकता.

आपण नेहमीच चाव्या ठेवण्यासाठी की-चेन ठेवतोच ठेवतो. तुम्हाला वाटलं तर तुम्ही नेल कटरचा की-चेनसारखा वापर करू शकता. छोट्या साईजचं नेल कटर की-चेन म्हणून वापरता येईल. मार्केटमध्ये असे छोटे नेल कटर मिळतात. ते तुम्ही खरेदी करू शकता.

### भविष्यवादी


स्वत:स मोठा भविष्यवादी म्हणविणारा एक गृहस्थ रस्त्यात उभा राहून भविष्य सांगत असे व एखाद्याची काही वस्तु हरवली असल्यास ती कोठे सापडेल, हेही सांगत असे.

एके दिवशी तो आपल्या या कामात अगदी गढून गेला असता, गर्दीतून धक्काबुक्की करीत एक थट्टेखोर माणूस त्याजकडे आला आणि घाबऱ्या घाबऱ्या म्हणाला, 'अहो, चला चला. तुमच्या घरास आग लागली असून इतक्यात सगळे घर जळूनही गेले असेल.' हे शब्द कानी पडताच ज्योतिषीबुवांनी एकदम आपल्या घराकडे धूम ठोकली.

त्याच्यामागून तो थट्टेखोर मनुष्य व इतर लोकही पळत चालले. तेथे गेल्यावर पाहतात, तो घर शाबूत असून, त्यास आग मुळीच लागलेली नाही. मग तो थट्टेखोर मनुष्य ज्योतिषीबुवाकडे वळून त्यास म्हणतो, 'काय हो, लोकांच्या नशिबात असलेल्या बऱ्यावाईट गोष्टी जर तुम्हांस कळतात, तर तुमच्या स्वतःच्या नशिबात काय आहे, हे तुम्हांस कसे बरे कळले नाही?' यावर भविष्यवादी खजिल होऊन निघून जातो.

तात्पर्य : एखादा गोष्टीची सुरुवात स्वत:पासून करावी.

## रहमते दर्शन (भाग - १)



जेब में रख ली और उस चिट्ठी पर हाथ रखे रहे। फिर पूछा कि क्या बात है? मेरे बताने पर महाराज जी ने कहा, उन्हें कहो कि वे चलकर मेरे पास आयें। कुछ दिनों में टाँग जुड़ गई और वे खुद चल कर महाराज दर्शनसिंह जी की सेवा में उपस्थित हो गये ।

इस प्रकार महाराज जी के लाइलाज मरीजों का अपनी दया-मेहर से इलाज किया। उनके लिए कोई अपना या पराया नहीं था । उनके लिए सभी अपने थे ।

### महाराज जी की दया दृष्टि

बात सन् १९८४ की है। मेरी धर्मपत्नी की छोटी बहन, जिसका नाम लक्ष्मी है, उसने परम संत महाराज कृपालसिंह जी से नाम लिया हुआ था। अपने ससुरालवालों से वह बहुत परेशान थी क्योंकि वे सब ही मद्य-पान करते और सामिष भोजन का प्रयोग करते थे ।

### उनके वचन रामबाण थे

एक बार लक्ष्मी जयपुर से हमारे यहाँ आई और वो अपने घर इसी कारण वापिस नहीं जाना चाहती थी। हमने उसको बताया कि दयाल पुरुष महाराज दर्शनसिंह जी सबके कष्टों के बारे में सुनते हैं और बहुत मदद करते हैं। अतः तुमभी अपनी बात महाराज जी के सामने रख दो। लक्ष्मी अपनी बहन के साथ कृपाल आश्रम आई और जब महाराज जी कोठी के बाहर आकर सबको दर्शन दे रहे थे, तो उसने भी अपनी बात महाराज के समक्ष रख दी। इस पर महाराज जी ने कहा, बेटे, अपने पति को मेरे पास ले आओ। मैं समझा दूँगा। बिना मेरे सामने लाये मैं क्या करूँ?

क्योंकि लक्ष्मी को पति के आश्रम तक आ जाने की बिल्कुल आशा नहीं थी, इसलिये उसने फिर महाराज जी से अर्ज कर दी। महाराज जी ने कहा, भई, मैंने तुम्हें अपने पति का लाने के लिए कहा तो था, ले आओ तभी मैं कुछ कर सकूँगा। लक्ष्मी चुप, क्या करती? फिर साहस करके कहने लगी, महाराज जी! उनका आना कठिन है। इस पर महाराज जी बोले, भई, प्रयत्न तो करो।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

हमें ऐसे वस्त्र पहनने चाहिये जिस से शरीर को हवा लगती रहे। आदमियों को नंगे बदन रहने में समस्या नहीं है। बहिनों के लिये यह बहुत मुश्किल काम है। शायद इसलिये बहिनों के लिये हमारे पूर्वजों ने साड़ी पहनने का नियम बनाया।

पूर्व, पश्चिम और उत्तर दिशा से चलने वाली हवा कोई ना कोई विकार पैदा करती है। दक्षिण दिशा से चलने वाली वायु बिल्कुल दोष रहित होती है। अत: इस वायु का सेवन करना चाहिये। दक्षिण दिशा से वायु सुबह ४ बजे से ले कर दिन निकलने तक अवश्य चलती है। वायु लाभ कुदरती वायु से मिलता है। बिजली के पंखे से हवा का लाभ नहीं होता। बिजली के पंखे से ली गई हवा से जोड़ो का दर्द हो जाता है। इस हवा का लेना आज के समय जरूरी हो गया है क्योंकि लोगों को सिर छिपाने की जगह भी बड़ी मुश्किल मिलती है। घूमने के लिये शहर से दूर जहां पेड़ हों अकेले ही चलना चाहिये। कम से कम ४-५ किलोमीटर जरूर चलना चाहिये। प्रत्येक व्यक्ति अपने से २१ इंच दूर तक की हवा खींचता और छोड़ता है। वायु फेफड़ों में १५ वर्ग फूट स्थान पर चक्र लगाती है। वायु की मात्रा कम होने से गठिया, लकवा, दर्द, अकड़न, नाड़ी विक्षेप आदि उत्पात खड़े हो जाते हैं। ऐसे रोगो में दवाई और योग के साथ भरपूर वायु भी लेनी है। दरवाजे खिड़कियां सदा खुली रखनी हैं।

### अनाहत चक्र

वायु तत्व के बिगड़ने से शारीरिक पीड़ा वा निराशा आती है। बिना किसी कारण मन में घुटन है, आलस्य है, मूड ठीक नहीं, उदासी खाली खाली सा लगता है, फ्रेश महसूस नहीं करते हैं तो इस का एक कारण यह भी है कि आप को साफ सुथरी हवा नहीं मिल रही । आप का अनाहत चक्र ठीक काम नहीं कर रहा है। इसे ठीक करने के लिये ५ मिनट पार्क जरूर जाओ।

अनाहत चक्र -७

यह चक्र जागृत होने पर सिद्धियां मिलती हैं। यह चक्र जागृत हो जाए तो व्यक्ति सूक्ष्म रूप ले सकता है, शरीर त्यागने की शक्ति भी प्राप्त हो जाती है। वायु नासिका द्वारा अंदर व बाहर होती रहती है। वायु को सभी अंगों तक पहुंचाना, अन्न जल का रस बना कर सभी

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

यमराज : हे प्राणी, तुम कहाँ जाना चाहते हो...?
स्वर्ग या नरक
आदमी : हे प्रभु पृथ्वी से मेरा मोबाईल और चार्जर
मंगवा दो कहीं भी रह लूँगा

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ अरेबिया फेलिन्स कोणत्या राष्ट्रास संबोधतात?

- फ्रान्स, रोमन, इटली

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

नामकरण संस्कार हा साधारणत: दहाव्या दिवसापासून शंभराव्या दिवसापर्यंत चांगला मुहूर्त बघून समारोहपूर्वक साजरा करावा. आपल्या कुळातील गोत्रांना, नातेवाइकांना, मित्रमंडळींना बालावून नामकरणविधी करावा. मातेने स्नान करावे. त्यानंतर बाळाला स्नान घालून बालकाच्या अगावर सुगंधित पदार्थाचा लेप लावावा. यामध्ये विशेषत्वाने मनशिल, हरताल, गोरोचन, अगरू आणि चंदन यांचा वापर करावा. यानंतर बाळाच्या वडिलांनी आपल्या बाळाला एक सुयोग्य नाव द्यावे.

✻ निष्क्रमण संस्कार -

बाळाला जेव्हा पहिल्यांदा घराबाहेर नेले जाते, त्या वेळेस जो संस्कार केला जातो, त्याला निष्क्रमण संस्कार असे म्हणतात. बाळाला ज्या दिवशी घराबाहेर घेऊन जायचे आहे, त्या दिवशी बाळाला देवघरामधील कुंकवाचा टिळा लावावा. त्याच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करावी. त्याला इतर लोकांची नजर लागू नये, याची देवाजवळ प्रार्थना करावी व प्रथमत: त्याला घराबाहेर नेल्यावर मंदिरामध्ये दर्शन घेण्यास जावे व देवादिकांचा शुभाशीर्वाद घ्यावा.

### षोडश संस्कार (सोळा संस्कार)

**शरच्छतं जीव शिशो । त्व देहैरभिरक्षित: ।**
**द्विजैरप्याशिषा पूतो गुरुभिश्चाभिनन्दित: इति ।।**
**का.खि.१२/५**

हे बाळा, तू देवाद्वारे रक्षित, पुरोहितांच्या आशीर्वादाने पवित्र व गुरुंद्वारे प्रशंसित होऊन तू शतायुषी जीवित राहो!

✻ अन्नप्राशन संस्कार -

आईच्या दुधाशिवाय बाळाला जेव्हा बाहेरचे अन्न वेळेस प्रथमतः अन्नाची पूजा करून 'अन्नप्राशन संस्कार' केला जातो. सहाव्या माह वरण-भाताचे पाणी, फळांचे रस, नाचणीसत्त्व सुरू करावे. यातील पहिले अन्न संस्कार केला जातो. सहाव्या महिन्यामध्ये बाळाला अन्नापासून माझ्या बाळाची शारीरिक व मानसिक वाढ चांगली होऊन त्याच्या आरोग्य व्हावे, अशी ईश्वराजवळ प्रार्थना करावी व अन्नपर्णादेवीचा खाली दिलेला मंत्र म्हणून बाळाला पाहला घास भरवावा.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायक देशमुख यांनी एम.आय.डी.सी.तील ऑटो व इंजिनियरिंग क्लस्टरला भेट देऊन तेथील प्रशिक्षण सुविधांची पाहणी केली.

# ऑटो व इंजिनियरिंग क्लस्टरमुळे कौशल्य विकासाला चालना मिळेल

## समिती सदस्य विनायक देशमुख यांना विश्वास

नगर – अहिल्यानगर एम.आय.डी.सी.तील ऑटो व इंजिनियरिंग क्लस्टरमुळे कौशल्य विकास कार्यक्रमाला चालना मिळेल, असा विश्वास कौशल्य विकास समितीचे सदस्य विनायक देशमुख यांनी व्यक्त केला.

श्री. देशमुख यांनी एम.आय.डी.सी.तील ऑटो व इंजिनियरिंग क्लस्टरला भेट देऊन तेथील प्रशिक्षण सुविधांची पाहणी केली. यावेळी श्री. देशमुख, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष गवळी, कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त निशांत सूर्यवंशी, आमी या संघटनेचे अध्यक्ष जयद्रथ खाकाळ उपस्थित होते. याप्रसंगी क्लस्टरचे अध्यक्ष दौलत शिंदे यांनी श्री.देशमुख यांचे स्वागत केले.

यावेळी बोलताना श्री. देशमुख म्हणाले, ऑटो व इंजिनियरिंग क्लस्टरमुळे अहिल्यानगर एम.आय.डी.सी. मध्ये प्रशिक्षणाची अद्यावत सुविधा उपलब्ध झाली आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध प्रशिक्षण कार्यक्रमाची या क्लस्टरशी सांगड घातल्यास जिल्ह्यातील उद्योग आस्थापनांसाठी मोठे प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण होण्यास मदत होईल व अनेक बेरोजगार युवकांना रोजगार उपलब्ध होईल. सध्या उद्योग खात्याच्या सचिव पदाचा कार्यभार अहिल्यानगरचे माजी जिल्हाधिकारी डॉ. पी. अनबल्गन यांच्याकडे आहे. एम.आय.डी.सी.तील अनेक प्लॉटचा कायदेशीर गुंता बऱ्याच दिवसापासून प्रलंबित आहे. त्या दृष्टीने आपण पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. यांच्या सहकार्याने हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करू, असे श्री. देशमुख यांनी सांगितले.

यावेळी क्लस्टर बाबतची माहिती देताना क्लस्टरचे अध्यक्ष दौलत शिंदे यांनी सांगितले, या क्लस्टरमध्ये प्रशिक्षणासाठी अद्यावत यंत्रसामग्री उपलब्ध आहे. तसेच १५० पेक्षा जास्त युवकांसाठी व ८० पेक्षा जास्त महिलांसाठी निवासाची सुविधा देखील उपलब्ध आहे. अहिल्यानगर शहरातील व जिल्ह्यातील युवकांनी याचा जास्तीत जास्त लाभ घेऊन रोजगारक्षम प्रशिक्षित व्हावे, अशी अपेक्षा आहे.

# संभाजी महाराजांचा आदर्श म्हणजे विचारांची प्रेरणा

## खासदार निलेश लंके यांचे प्रतिपादन; छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त पहिले ग्रामीण मराठी साहित्य संमेलन उत्साहात



छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त पहिले ग्रामीण मराठी साहित्य संमेलन उत्साहात पार पडले.

नगर – संभाजी महाराजांनी धर्माचे रक्षण करुन स्वराज्यासाठी लढले. स्वराज्यासाठी बलिदानही दिले. संभाजी महाराजांचे बलिदान केवळ शरीराचे नव्हते, तर तो सर्वस्वी त्याग होता. त्यांनी धर्मरक्षणासाठी आणि स्वराज्यासाठी लढा दिला. त्यांचे जीवन हे आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या धैर्याचा आणि निष्ठेचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला तर कोणतीही अडचणीचा सामना करता येणार असल्याचे प्रतिपादन खासदार निलेश लंके यांनी केले.

निमगाव वाघा (ता. नगर) स्व.पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ आणि धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त पहिले ग्रामीण मराठी साहित्य संमेलन उत्साहात पार पडले. गावातील परिवार मंगल कार्यालयात पार पडलेल्या या संमेलनाच्या उद्घाटनाप्रसंगी खासदार लंके बोलत होते. याप्रसंगी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा सरोज अल्हाट, साहित्यिक भारत सातपुते, संमेलनाचे संयोजक तथा ग्रामपंचायत सदस्य पै. नाना डोंगरे, कवी संमेलनाचे अध्यक्ष रज्ज़ाक शेख, गीताराम नरवडे, साहेबराव बोडखे, भागचंद जाधव, बाळासाहेब देशमुख, पोपटराव साठे, ॲड. रामदास सूर्यवंशी, दिलावर शेख, राष्ट्रपती शिक्षक पुरस्कार प्राप्त डॉ. अमोल बागुल, आनंदा साळवे, सोसायटीचे सदस्य अतुल फलके, डॉ. विजय जाधव, रामदास फुले, जालिंदर आतकर, रामदास पवार, संदीप रासकर, देवीदास बुधवंत आदींसह कवी, साहित्यिक, ग्रामस्थ व साहित्य प्रेमी उपस्थित होते.

छत्रपती संभाजी महाराज यांच्या ग्रंथाचे पूजन करुन व दीपप्रज्वलनाने संमेलनाचे उद्घाटन झाले. खासदार लंके यांच्या हस्ते विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा पुरस्काराने सन्मान करण्यात आला. सकाळच्या सत्रापासूनच ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत यांचे परिसंवाद आणि व्याख्याने रंगली होती.

सरोज आल्हाट म्हणाल्या की, कवी, लेखक सामाजिक वास्तवतेचे दर्शन घडवितात. कवीता हा जीवनाला स्फुर्ती व आनंद देत असतात, तसेच महिला सक्षमीकरण्यासाठी ग्रामीण भागातले छोटे–मोठे उद्योग उपलब्ध करून द्यावेत ग्रामीण भागामध्ये वाचनालय आहे पण मुलांना त्याची आवड नाही. त्यांना वाचणाची आवड निर्माण होण्याच्या दृष्टीकोनाने एक तास वाचनासाठी हे उपक्रम राबविण्याचे त्यांनी आवाहन केले.

भारत सातपुते यांनी जग कशाप्रकारे वागते हे महत्त्वाचं नाही आपण प्रामाणिकपणे वागल पाहिजे, असे सांगून पै. नाना डोंगरे यांच्या सामाजिक व सर्वच क्षेत्रातील निस्वार्थ कार्याचे त्यांनी कौतुक केले.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, ग्रामीण भागातील साहित्य व काव्यप्रतिभेला व्यासपीठ उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनाने या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती संभाजी महाराज हे स्वयं उत्कृष्ट साहित्यिक होते. त्यांनी विविध भाषांचे सखोल अध्ययन केले होते तसेच अभ्यासपूर्ण ग्रंथनिर्मितीही केली होती. त्यांच्या कार्यातून नवोदित साहित्यिकांना प्रेरणा मिळावी, या उद्देशाने त्यांच्या जयंती दिनानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

संध्याकाळच्या सत्रात रंगलेल्या काव्य संमेलनात ज्येष्ठ आणि नवोदित कवींच्या जुगलबंदीने रसिकांची मने जिंकली. विविध सामाजिक, सांस्कृतिक, ग्रामीण आणि राष्ट्रीय विषयांवर सादर करण्यात आलेल्या कवितांना प्रतिसाद मिळाला. यावेळी ग्रंथ प्रदर्शनाला देखील साहित्यप्रेमींनी भेट दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमोल बागुल यांनी केले. रज्ज़ाक शेख यांनी आभार मानले.

### उत्कृष्ट संसदपटू पुरस्काराने खासदार निलेश लंके यांचा सन्मान

संमेलनाच्या निमित्ताने खासदार निलेश लंके यांना उत्कृष्ट संसदपटू पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सामान्य जनता आणि शेतकरी वर्गाचे प्रश्न संसदेत सातत्याने मांडून त्यांचे निराकरण करण्यासाठी घेतलेला पुढाकार लक्षवेधी ठरल्याने त्यांचा गौरव करण्यात आला.

# समर्पण फक्त शब्दांपुरते सीमित न राहता ते प्रत्येक कृतीतून दिसावे

## सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांचे प्रतिपादन; निरंकारी भक्तगणांकडून समर्पण दिवसनिमित्त बाबा हरदेवसिंहजी यांना श्रद्धा सुमने अर्पित



नगर – संत निरंकारी मिशनच्या वतीने समर्पण दिवसाचे औचित्य साधून बाबा हरदेवसिंहजी महाराज यांच्या पुण्यस्मरणार्थ एक भावपूर्ण वर्चुअल संत समागम आयोजित करण्यात आला. सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज आणि निरंकारी राजपिता जी यांच्या पावन उपस्थितीत १३ मे रोजी आयोजित केलेल्या या समागमात देशविदेशातून लाखो श्रद्धाळूंनी ऑनलाइन सहभाग घेतला.

समर्पण दिवसाच्या निमित्ताने मंडळाच्या नगर शाखेच्यावतीने मिस्कीनरोड स्थित निरंकारी सत्संग भवन येथे विशेष सत्संग समारोहाचे आयोजन करण्यात आले ज्यामध्ये शेकडो भाविक भक्तगणांनी भाग घेतला आणि बाबा हरदेवसिंहजी महाराज यांचे दिव्य जीवन व शिकवणूकीतून प्रेरणा प्राप्त केली.

सतगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांनी वर्चुअल सत्संगाद्वारे श्रद्धाळू भक्तगणांना संबोधित करताना सांगितले की सतगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज यांचे जीवन क्षणोक्षणी प्रेम, त्याग, सेवा आणि दिव्य शिकवणूकींनी परिपूर्ण होते. असेच भक्तिभावाचे समर्पित जीवन आपलेही व्हावे, समर्पण फक्त शब्दांत न राहता ते आचरणात उतरायला हवे असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

सतगुरु माताजी नी स्पष्ट केले

समर्पण दिवस ही केवळ एक तारीख नसून, ही एक संधी आहे विचार करण्याची की – आपण खरोखरच आपल्या जीवनाला या शिकवणींशी जोडले आहे का? प्रेम, एकता, मानवता आणि विनम्रता हे आपल्या जीवनात आत्मसात करूनच आपण या दिवसाला खरा अर्थ देऊ शकतो. हाच बाबाजींच्या प्रति खरा आदर आणि समर्पण ठरेल असे शेवटी सांगितले.

निश्चितच, बाबा हरदेवसिंहजी यांची दिव्य प्रतिमा प्रत्येक भाविक भक्ताच्या अंत:करणात एक अमिट आठवण म्हणून कायम राहील. त्यांच्या अमूल्य उपकारांसाठी संपूर्ण निरंकारी परिवार त्यांचा सदैव कृतज्ञ राहील.

आज सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज, बाबाजींची शिकवण पुढे घेऊन जात असून ब्रह्मज्ञानाच्या दिव्य प्रकाशाने संपूर्ण मानवतेला उजळवत आहेत.

# संगमनेर येथे १८ मे रोजी राज्यस्तरीय सर्वपंथीय ख्रिस्ती वधू वर परिचय मेळावा

नगर – महाराष्ट्र अल्पसंख्यांक ख्रिस्ती विकास परिषद व साप्ताहिक उपदेशक यांच्या संयुक्त विद्यमाने १८ मे रोजी सकाळी १० वाजता पंचवटी हॉटेल, संगमनेर येथे राज्यस्तरीय सर्व पंथीय ख्रिस्ती वधू–वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ख्रिस्ती विकास परिषदेचे अध्यक्ष अनिल भोसले व साप्ताहिक उपदेशकचे विक्रम गायकवाड यांनी दिली.

या मेळाव्यामध्ये प्रमुख उपस्थितीमध्ये बाळासाहेब थोरात, आमदार सत्यजित तांबे, मेळाव्याचे उद्घाटन सेंट मेरी चर्चचे प्रमुख धर्मगुरू फा. ज्यो.गायकवाड यांच्या हस्ते होणार असून मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी डॉ.सुधीर तांबे तर जॉर्ज क्षेत्रे, प्रकाश लोखंडे, लुकास पाटोळे, ज्ञानमाता विद्यालयाचे प्राचार्य फा.फ्रान्सिस पटेकर, संत ईग्नाथी चर्चेचे प्रमुख धर्मगुरू नेल्सन परेरा, प्रशांत शहाराव, मेथॉडिस्ट चर्चचे सतीश मिरजकर, पास्टर फेलोशिपचे अध्यक्ष पा. शिवाजी लांडगे, ग्रेगरी केदारी, प्रा.बाबा खरात, दीपक शेळके, विजय दारोळे, मच्छिंद्र जगताप, बी.के. गायकवाड, ॲड.विजयानंद पगारे, बाळासाहेब घोडके, यशस्वी फाऊंडेशनचे अध्यक्ष आदित्य घाटगे, लाजारास केदारी, डॉ.अरविंद सांगळे, राजीव साळवे आदी उपस्थित राहणार आहेत.

मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष दीपक कदम, प्रशांत यादव, सनी गायकवाड, फेड्री फर्नांडीस, अन्तोंन भोसले, प्रभाकर चांदेकर, सुहास गायकवाड, मार्कस बोर्डे, सचिन मुन्तोडे, सिमोन रूपटक्के, भाऊसाहेब नेटके, सुरेश गायकवाड, सुरेश ठुबे आदींनी केले आहे.

# राज्यस्तरीय 'उत्कृष्ट कार्यकर्ता' पुरस्कार नगर येथील जयंत येलुलकर यांना जाहीर



नगर – महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणेच्या वतीने देण्यात येणारा रत्नाकर कुलकर्णी स्मरणार्थ उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार अहिल्यानगरचे व महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सावेडी उपनगर शाखेचे प्रमुख कार्यवाह जयंत येलूलकर यांना जाहीर झाला आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी या राज्यस्तरीय पुरस्काराची घोषणा पुणे येथे केली. मसापच्या १२० व्या वर्धापन दिनानिमित्त २७ मे रोजी सकाळी १० वाजता पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या माधवराव पटवर्धन सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमात मसापचे अध्यक्ष रावसाहेब कसबे यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. स्मृतिचिन्ह आणि रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

रसिक ग्रुपचे अध्यक्ष जयंत येलुलकर यांचे सामाजिक, सांस्कृतिक शैक्षणिक, क्रीडा, राजकारण व साहित्य अशा विविध क्षेत्रांमध्ये मोठे योगदान आहे. अहिल्यानगर शहरात म.सा.प च्या सावेडी उपनगर शाखेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली या शाखेचे प्रमुख कार्यवाह असलेले जयंत येलूलकर वर्षभर विविध साहित्यिक उपक्रम राबवत असतात. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी नगरवासीयांची स्वाक्षरी मोहीम, केंद्र सरकारकडे या मागणीचे लक्ष वेधून घेण्यासाठी सर्व खासदारांना मागणीचे पत्र, निवेदन, चौक सभा आदी उपक्रम यशस्वीपणे राबवून पाठपुरावा केला. महाराष्ट्र साहित्य परिषद, सावेडी उपनगर शाखा व शांतीकुमार फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन यांच्या वतीने गेल्या १० वर्षापासून प्रकाशित होत असलेल्या वारसा दिवाळी अंकाने साहित्य विश्वात मानाचे स्थान प्राप्त केले असून गेल्या चार वर्षांपासून अंकास राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरविले जात आहे. अहिल्यानगर येथे सावेडी उपनगर शाखेच्या आयोजनाखाली संपन्न झालेले महाराष्ट्र साहित्य परिषदेचे विभागीय साहित्य संमेलन यशस्वीपणे पार पाडले होते. संमेलनाच्या नियोजनाचे साहित्य विश्वात मोठे कौतुक झाले होते. जिल्ह्यातील साहित्यिकांना व कवींना प्रोत्साहन मिळण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन जयंत येलुलकर करीत असतात. त्यांच्या या योगदानाची दखल घेऊन त्यांना पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था निमगाव वाघा यांच्यावतीने सन २०२५ समाज रत्न पुरस्कार श्रीनिवास बोज्ञा यांना प्रदान करण्यात आला.

# छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय पुरस्काराने अहिल्यानगर येथील श्रीनिवास बोज्ञा यांचा सन्मान

नगर – स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था निमगाव वाघा तालुका जिल्हा अहिल्यानगर यांच्यावतीने सन २०२५ समाज रत्न पुरस्कार श्रीनिवास बोज्ञा यांना छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय समाज रत्न पुरस्कार अहिल्यानगर दक्षिणचे खासदार निलेश लंके यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

सालाबाद प्रमाणे याही वर्षी स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था निमगाव वाघा यांच्यावतीने सामाजिक शैक्षणिक राजकीय अध्यात्मिक क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना राज्यस्तरीय छत्रपती संभाजी महाराज पुरस्कार देण्यात येत असतो. याही वर्षी हा पुरस्कार अहिल्यानगर येथील फटाका व्यापारी असोसिएशनचे माजी अध्यक्ष श्रीनिवास बोज्ञा यांना प्रदान करण्यात आले. यावेळी स्वर्गीय पैलवान किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष नाना किसन डोंगरे यांनी या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमोल बागुल यांनी केले.

# पवन नागरी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी बाळासाहेब हुच्चे तर मनोज क्षीरसागर व्हाईस चेअरमन



नगर – शहरातील पवन नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अहमदनगर यांच्या चेअरमन, व्हाईस चेअरमनपदाची नुकतीच निवड पार पडली. यावेळी चेअरमनपदी बाळासाहेब वामनराव हुच्चे यांची तर व्हाईस चेअरमनपदी मनोज लक्ष्मण क्षीरसागर यांची एकमताने निवड करण्यात आली.

चेअरमन बाळासाहेब हुच्चे यांनी सांगितले की, पतसंस्थेने नेहमीच ग्राहकांचे हित डोळ्यासमोर ठेवून पारदर्शक आणि विश्वासार्ह सेवा दिली आहे. संचालक मंडळाच्या सहकार्याने ही वाटचाल अधिक प्रभावीपणे पुढे नेऊ. सभासदांचा विश्वास आमच्यासाठी सर्वोच्च असून, संस्था आर्थिकदृष्ट्या आणखी मजबूत करण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत.

व्हाईस चेअरमन मनोज क्षीरसागर यांनीही आपल्या भावना व्यक्त करताना म्हटले की, पतसंस्थेच्या माध्यमातून सामान्य जनतेला आर्थिक पाठबळ देण्याचे कार्य सुरूच राहील. नवीन योजनांच्या अंमलबजावणीसाठी आम्ही प्रयत्नशील राहू. चेअरमनसह सर्व संचालक मंडळाचा अनुभव आणि सहकार्यामुळे पतसंस्था नव्या उंचीवर नेणार, असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी संचालक किरण धारक, दत्तात्रय डोळसे, निशिकांत शिंदे, प्रसाद शिंदे, संजय धोकरिया, सौ. अर्चना काळे, सौ. आशा चोरे, अभय काळे, दीपक भागवत आदी उपस्थित होते. प्रास्तविक प्रसाद शिंदे यांनी केले. सुत्रसंचालन किरण धारक यांनी केले. तर आभार दत्तात्रय डोळसे यांनी मानले.





बुद्ध पौर्णिमेनिमित्त निलक्रांती चौक मित्र मंडळातर्फे थंडगार शितपेय आणि सरबताचे वाटप करण्यात आले.

# बुद्ध पौर्णिमेनिमित्त निलक्रांती चौक मित्र मंडळातर्फे शितपेय व सरबताचे वाटप

नगर – दरवर्षीप्रमाणे निलक्रांती चौक मित्र मंडळातर्फे थंडगार शितपेय आणि सरबताचे वाटप करण्यात आली. सदर कार्यक्रमास नोटरी पब्लिक भारत सरकार ॲड. संदीप पाखरे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख गिरीश जाधव, सलीम शेख, मेजर कैलास ठुबे, अशोक पारदे, अमोल पाडळे, अक्षय साळवे, रामा साळवे, अमोल साळवे, संदीप साळवे उपस्थित होते.

यात्प्रसंगी बोलताना ॲड. संदीप पाखरे म्हणाले की, निलक्रांती चौक मित्र मंडळ नेहमीच सामाजिक कामात अग्रेसर असतात, तथागत गौतम बुद्ध यांच्या पौर्णिमेनिमित्त दरवर्षी सामाजिकतेची जाणीव ठेवून विविध उपक्रमाद्वारे आणि अत्यंत धार्मिकपणे बुद्ध पौर्णिमा साजरी केली जाते. ही अत्यंत आदर्श वाटेल अशी बाब असून निलक्रांती चौक मित्र मंडळ नेहमीच अशा कार्यक्रमाद्वारे समाजाला आदर्श वाटेल याप्रमाणे सामाजिकतेचा ऐक्याचा एक मोलाचा संदेश देण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला जातो याबाबत मंडळाच्या सर्व सदस्यांना धन्यवाद देऊन बुद्ध पौर्णिमेनिमित्त सर्व बौद्ध धर्मीयांना यांना आणि बौद्ध अनुयायांना शुभेच्छा दिल्या..

कार्यक्रमात प्रथमतः महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्ध यांच्या पुतळ्यांना उपस्थित सर्वांच्या वतीने अभिवादन करून बुद्ध वंदना घेण्यात आली.. तदनंतर थंडगार शितपेय आणि सरबताचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निलेश गायकवाड, विजय साळवे, यश साळवे, किरण भादवे, रोहित शिरसाठ, मनोज साळवे, सुजित साळवे, प्रवीण भिंगारदिवे, रोहित साळवे, प्रशांत भोसले आदींनी सहकार्य केले.

# 'सोहम कप क्रिकेट लीग स्पर्धे'त 'मॅन ऑफ दि सिरिज' दिशान गांधी याच्या अवघ्या ३५ चेंडूत नाबाद १०२ धावा

## ११ षटकार आणि ७ चौकारांची आतिषबाजी



'मॅन ऑफ दि सिरिज' चा कप दिशान गांधी यांना देताना अमित बुरा.

नगर – नगरमध्ये आयोजित प्रत्येकी १० षटकांच्या सोहम कप क्रिकेट स्पर्धेत अवघ्या ३५ चेंडूत शतक झळकावण्याची उत्तुंग कामगिरी करणारा दिशान गांधी हा एकमेव खेळाडू ठरला आहे. नाबाद शतकी खेळी करून त्याने आपल्या अष्टपैलू खेळाची चुणूक दाखवली आहे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे, असे प्रतिपादन सोहम ग्रुपचे मॅनेजिंग डायरेक्टर अमित बुरा यांनी केले.

उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या विशेष पुढाकाराने आयोजित भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या मैदानावर सोहम कप प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धा नुकतीच पार पडली. या स्पर्धेत अंतिम सामन्यात अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मिडीयम स्कूलकडून खेळताना दिशान गांधी याने ऐतिहासिक खेळी केली.

अमित बुरा पुढे म्हणाले की, सध्या आपण आयपीएल क्रिकेट स्पर्धा पाहत आहोत. त्याच दर्जाची नेत्रदीपक आणि सर्वोत्कृष्ट खेळी करून दिशानने सर्व क्रिकेट प्रेमींना अनोखा आनंद मिळवून दिला.

या स्पर्धेत दिशान गांधी याने सहा सामन्यात ७३ सरासरीने आणि २४० च्या स्ट्राईक रेटने तब्बल २९१ धावा केल्या. याशिवाय गोलंदाजी करताना ८ बळीही घेतले. त्याने मारलेल्या २७ षटकारांपैकी १७ षटकार उपांत्य व अंतिम सामन्यात ठोकले. त्याने एकूण २४ चौकारही लगावत शैलीदार फलंदाजी केली.


अष्टपैलू खेळाडू ठरलेल्या दिशान गांधी याला अमित बुरा यांच्या हस्ते 'मॅन ऑफ दि सिरीज' किताबाने सन्मानित करण्यात आले.

या यशाबद्दल त्याचे अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, उद्योजक गौरव फिरोदिया, प्राचार्य प्रभाकर भाबड सर, जाधव सर आदींनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

दिशान गांधी हा माजी क्रिकेटपटू किशोर गांधी व दिशान ॲडच्या संचालिका बबिता गांधी यांचा मुलगा आहे. तो आंतरराष्ट्रीय कॉर्फ बॉल खेळाडू तसेच विद्यापीठ बास्केटबॉल खेळाडू आहे

# दृष्टी नाही, पण दृष्टिकोन मोठा; तहेरीनचे दहावीच्या परिक्षेत यश

**सनशाइन क्लासेसच्या विद्यार्थ्यांची घवघवीत कामगिरी**


तहेरीन शेख


सानिया शेख

नगर - जिद्द असेल तर अडथळे अपयशात नव्हे, तर यशातच बदलता येतात, हे शब्द तंतोतंत लागू होतात गजराज नगरमधील सनशाइन क्लासेसच्या विद्यार्थिनी तहेरीन खालीद शेख हिच्या जीवनावर. तिने दहावीच्या परीक्षेत ८१.४० टक्के गुण मिळवत संपूर्ण दृष्टी नसतानाही अपूर्व यश संपादन केले आहे. तिच्याबरोबरच सानिया फयाज शेख हिनेही ७६.२० टक्के गुण मिळवत यशाची उंची गाठली आहे.

विशेष म्हणजे, तहेरीन ही १००% दृष्टीहीन आहे. मात्र याचा कोणताही न्यूनगंड न बाळगता तिने शिक्षणाची आवड आणि अभ्यासाची तळमळ याच्या जोरावर हे यश संपादन केले. तिच्या या प्रवासात तिला तिच्या कुटुंबीयांचे, शिक्षकांचे आणि सनशाइन क्लासेसच्या शहाना अंजुम शेख यांचे मार्गदर्शन लाभले.

तहेरीनने अंधत्वाच्या अडथळ्यांना न जुमानता स्वतःचे भविष्य घडवले आहे. आज अनेक विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांसाठी ती प्रेरणास्थान ठरत आहे.

सानिया फयाज शेख हिनेही उत्तम गुण मिळवत आपल्या कष्टाची फळे मिळवली आहेत.

तहेरीन आणि सानिया या दोघींनी दाखवलेली मेहनत, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोन हे आजच्या पिढीसाठी मार्गदर्शक आहेत.

# सीबीएसईच्या दहावीच्या निकालात आयकॉन पब्लिक स्कूलचे यश

**आयुष बोडखे ९९.२ टक्के गुणांसह नगर शहरासह जिल्ह्यात प्रथम**



नगर - सीबीएसई बोर्ड परीक्षा २०२५ मध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करून आयकॉन पब्लिक स्कूलने अभिमानास्पद शैक्षणिक टप्पा साजरा केला. शाळेतील आयुष मुकेश बोडखे याने ९९.२ टक्के गुणांसह अभूतपूर्व यश मिळवले आहे, शहर आणि जिल्ह्यातील सर्व सीबीएसई शाळांमध्ये त्याने अव्वल स्थान पटकावले आहे. आयुषने विज्ञान, सामाजिक विज्ञान आणि हिंदीमध्ये प्रत्येकी १००, गणितात ९९ आणि इंग्रजीत ९७ गुण मिळवले, जे विषयांमध्ये उत्कृष्ट सुसंगतता दर्शवते. त्याला पुढे प्रतिष्ठीत कॉलेजमधून इंजिनिअरींग करण्याची इच्छा आहे.

शाळेतील अनेक विद्यार्थ्यांनी देखील चांगली कामगिरी केली आह. ऋग्वेद खामकर, अथर्व लोहार, कनाला अगस्त्य आणि उमा रंजन यांनी इंग्रजीत १०० गुण मिळवले.

सई जगताप, रोशनी कलानी, हर्ष चोरबेले आणि अथर्व लोहार यांनी गणितात ९९ गुण मिळवले. रोशनी कलानी, हर्ष चोरबेले, रोहन नारायण आणि अयान थापर यांनी विज्ञान आणि सामाजिक शास्त्रात विषयवार चांगले गुण मिळवले. निशिता मुथा आणि सई जगताप यांनी इंग्रजीत ९९ गुण मिळवले आणि प्रिया शिंदे व सिद्धी लोटके यांनी गणितात ९८ गुण मिळवले.

एकूण गुणांनुसार सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्यांमध्ये हे समाविष्ट आहे: सई जगताप - ९७.२ टक्के, सिद्धी लोटके - ९७ टक्के, ऋग्वेद खामकर - ९६.६ टक्के, रोशनी कलानी - ९६.२ टक्के, हर्ष चोरबेले आणि कनाला अगस्त्य - ९५.८ टक्के, अथर्व लोहार आणि अयान थापर - ९५.२ टक्के, रोहन नारायण आणि मानसी मुथा - ९५ टक्के.

एकूण २२ विद्यार्थ्यांनी ९० टक्के पेक्षा जास्त गुण मिळवले. प्राचार्य दीपिका नगरवाला यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना म्हटले की, हे निकाल केवळ संख्या नाहीत - ते वर्षानुवर्षे केलेल्या कठोर परिश्रमाचे, मार्गदर्शनाचे आणि वाढीचे प्रतिनिधित्व करतात. आमच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक निकालांच्या बाबतीत आणि आयकॉनमध्ये त्यांनी निर्माण केलेल्या मजबूत व्यक्तिमत्त्वाच्या बाबतीत जे काही साध्य केले आहे त्याचा आम्हाला अभिमान आहे.

## गुगळे हायस्कूलचा दहावी परिक्षेचा निकाल ९७.६५ टक्के

नगर - शिशु संगोपन संस्था संचालित श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूल अहिल्यानगरचा मार्च-२०२५ एस.एस.सी. बोर्ड परीक्षेचा निकाल ९७.६५ टक्के लागला असून विद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली आहे. विद्यालयातील विशेष प्राविण्याने २५, प्रथम श्रेणीत ४६ तर द्वितीय श्रेणीत ३५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये चि. दरंदले सार्थक राजेंद्र ९३.६० टक्के मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. तर कु. गायकवाड श्रध्दा संजय ९३.२० टक्के मिळवून द्वितीय, कु. साठे रिकीता किरण ९२.४० टक्के मिळवून तृतीय व कु. कांबळे साक्षी नवनाथ ९१.६० टक्के चतुर्थ क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. गुणवंत विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे चेअरमन दिलीप गुंदेचा, व्हा. चेअरमन दशरथ खोसे, सेक्रेटरी र. धों. कासवा, सहसेक्रेटरी राजेश झालानी, खजिनदार ॲड. विजय मुनोत, विश्वस्त व पदाधिकारी, प्राचार्य कसबे, प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ. गांधी, सेवकवृंद व पालक यांनी अभिनंदन केले.


डॉ. पी.ए. इनामदार माध्यमिक विद्यालय व गुरुकुल हायस्कूलमधील दहावीच्या परिक्षेत यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सकार करण्यात आला.

# गुरुकुल कॅम्पसमध्ये निकालाची परंपरा कायम; माध्यमिक विद्यालयाचा १०० टक्के निकाल

नगर - गुरुकुल कॅम्पस येथील एकता एज्युकेशन सोसायटीचे डॉ. पी.ए. इनामदार माध्यमिक विद्यालय व गुरुकुल हायस्कूलचा निकाल १०० टक्के लागला आहे. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत पुणे बोर्डाचा इ. १० वीचा निकाल नुकताच जाहीर झाला असून दरवर्षीप्रमाणे या वर्षी ही विद्यालयाचा विद्यार्थ्यांनी इ. १० वी च्या परीक्षेत उत्तुंग यश संपादन केले.

परीक्षेत बसलेले सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले.यामध्ये गुरुकुल हायस्कूल चे अनुक्रमे प्रथम कु. खान आमना फिरोज (९३.००%), द्वितीय कु. शिंदे अक्षदा अरुण (८६.८०%), तृतीय कु. खान इरम अय्याज (८५.६०%) त्याचप्रमाणे डॉ. पी.ए.इनामदार माध्यमिक विद्यालयाचे अनुक्रमे प्रथम कु. काळे संयुक्ता संदीप (७६.००%), द्वितीय कु. शेख सना अय्युब (७५.६०%) व तृतीय कु. कांबळे स्नेहल संतोष (७४.००%) या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळा समिती चेअरमन अनिल साळुंके, संस्थेचे अध्यक्ष एन.ए. पठाण, संचालक दिनकर टेमकर, शाळा समिती सदस्य देविदास डहाळे, लक्ष्मीकांत गरड, समीर पठाण, प्राचार्य शुभम टेमकर, गुरुकुल हायस्कूल च्या प्राचार्या दीप्ती कराळे, मुख्याध्यापिका कुंदा झोंड यांनी अभिनंदन केले.

यशस्वी विद्यार्थ्यांना गवारे अभिजित, शेख सबिहा, शेख कनिजफातिमा यांचे मार्गदर्शन लाभले.

## श्री बाणेश्वर विद्यालयाचे बारावीच्या परीक्षेत यश

नगर - माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२५ या परीक्षेमध्ये तालुक्यातील श्री बाणेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, बुऱ्हाणनगर, ता. जि. अहिल्यानगर या विद्यालयाचा विज्ञान शाखेचा शेकडा निकाल १००%, वाणिज्य शाखेचा निकाल ९८.६९% एवढा लागला असून विद्यालयातील प्रथम, द्वितीय, तृतीय विद्यार्थी खालीलप्रमाणे -

प्रथम - कु. चितळे श्रुती दिलीप (९५.२० टक्के), कु. गायकवाड प्रांजली लहू (९३.००), चि. देशमानकर सोहम सचिन (९२.६०), कु. शिंदे मानसी संपत (९२.६०)

वरील सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष आ. शिवाजी कर्डिले, संस्थेचे संचालक अक्षय कर्डिले व इतर संचालक मंडळ तसेच रजिस्ट्रार श्री. बोर्डे, प्राचार्य हापसे के. एम., पर्यवेक्षक शिकारे सी. डी. यांनी अभिनंदन केले.

# लिटील वंडर्स स्कूलचे उत्तुंग यश

**सलग १४ वर्षांची SSC च्या १००% निकालाची परंपरा कायम**


दर्शन काळे | ऐश्वर्या पटारे | समृद्धी हरेर

नगर - शांतिनिकेतन फौंडेशनचे लिटील वंडर्स स्कूल व विजडम हायस्कूल जेऊर (बा.), ता. नगर, जि. अहिल्यानगर या शाळेच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये सलग चौदाव्या वर्षीही माध्यमिक शालांत परीक्षेमध्ये शाळेच्या शंभर टक्के निकालाची उत्तुंग परंपरा कायम ठेवीत घवघवीत यश संपादन केले.

या वर्षी शाळेचा विद्यार्थी दर्शन गणेश काळे याने ९२.०० % गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला, कु. ऐश्वर्या गंगाधर पटारे हिने ९१.४० % गुण मिळवून द्वितीय तर कु. समृद्धी सोमनाथ हरेर हिने ८७.६०% गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. इतर सर्व विद्यार्थी ही विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले.

आमच्या विद्यालयात प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देवून परीक्षेची तयारी करवून घेतली जाते त्यामुळेच बाहेरचे कोणतेही महागडे कोचिंग क्लासेस लावायची गरज पडत नाही, व त्यामुळे उत्तम आणि दर्जेदार शिक्षणाबरोबरच शिस्त आणि संस्कार त्रिवेणी संगम झाल्यामुळे सलग १४ वर्ष १०० % निकाल देणारे आमच्या पंचक्रोशीतील हे एकमेव विद्यालय आहे, तसेच मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती शाळेच्या संचालिका सौ. स्वाती चेमटे यांनी दिली व या सर्व बाबींमुळे आमची शाळा परिसरातील सर्व अभ्यासू आणि जागरूक पालकांसाठी एक सर्वोत्तम पर्याय म्हणून नावारूपाला आल्याबद्दल समाधान व्यक्त केले.

यासाठी शाळेच्या शिक्षिका सौ. कल्पना वड्डेपल्ली, सौ. आयेशा सय्यद यांनी विशेष परिश्रम घेतल्याची माहिती शाळेचे मुख्याध्यापक एस. पी. खेडकर यांनी दिली. तसेच निवृत्त मुख्याध्यापक के. व्ही. दुबे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व शिक्षकांचे अभिनंदन केले.

या सर्व विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे जि. प. माजी सभापती बाजीराव पाटील गवारे, सरपंच सौ. ज्योतीताई तोडमल, उपसरपंच सौ. अनिता बनकर, माजी सरपंच मधुकरराव मगर व विकास कोथिंबीरे विलासराव देशमुख, विलासराव काळे तसेच पंचक्रोशीतील सर्व पालकांनी अभिनंदन केले आहे.

# केडगावच्या अंबिका विद्यालयाचा दहावी परिक्षेचा निकाल ९९.४५%

नगर - केडगाव देवी अहिल्यानगर येथील रयत शिक्षण संस्थेच्या अंबिका विद्यालयाचा दहावीचा निकाल ९९.४५% इतका लागला. विद्यालयाने उज्वल निकालाची परंपरा याही वर्षी कायम राखली. विद्यालयाचे एकूण १७ विद्यार्थी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झाले.

५१ विद्यार्थ्यांनी ८०% पेक्षा जास्त गुण प्राप्त केले. विद्यालयात प्रथम क्रमांक कु. वायबसे मयुरी सचिन (९७.२०%), द्वितीय क्रमांक पानसरे ऋग्वेद रवींद्र (९४.४०%), तृतीय क्रमांक खोडाळ अमन गोरख (९३.६०%), घुगे देवदत्त राजेंद्र (९३.६०%) या विद्यार्थ्यांनी प्राप्त केला.

यशस्वी विद्यार्थ्यांचे पद्मश्री पोपटराव पवार साहेब, माजी सचिव शिवाजीराव भोर, स्कूल कमिटी सदस्य किसन सातपुते, महेश गुंड, सल्लागार समिती सदस्य उद्योजक रावसाहेब सातपुते, अंबादास गारुडकर, प्रशांत कोतकर, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा विभागीय अधिकारी प्राचार्य नवनाथ बोडखे, उपमुख्याध्यापक सुखदेव मुरूमकर, पर्यवेक्षक अभयकुमार चव्हाण, पंचक्रोशीतील मान्यवर तसेच सल्लागार मंडळ, स्कूल कमिटी सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांनी अभिनंदन केले. या सर्व विद्यार्थ्यांना सिताराम जपकर, रोहिणी चोभे, विलास भोंदे, प्रदीप गारुडकर, महेश ढगे, कुशाभाऊ अकोलकर, राजेंद्र जाधव, रवीकुमार तंटक, किसन रोहोकले, जयश्री बामदळे, अरुणा दरेकर, स्वाती चोभे, उर्मिला खिलारी, सरस्वती दुधाडे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

# श्री साई इंग्लिश मिडीयम स्कूल व ज्युनिअर कॉलेजचा एसएससीचा निकाल १०० टक्के


श्री साई इंग्लिश मिडीयम स्कूल व ज्युनिअर कॉलेजचा एस.एस.सी. निकाल १०० टक्के लागला.

नगर - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून श्री साई इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज शाळेतील दहावीचे सर्व विद्यार्थी यशस्वीरित्या उत्तीर्ण झाले. यावर्षी शाळेतील दहावीच्या विद्यार्थ्यांची यश यात्रा विशेष उल्लेखनीय आहे. फेब्रुवारी मार्च २०२५ या परीक्षेला विद्यालयातून एकूण ५७ विद्यार्थी परीक्षेत प्रविष्ठ झाले होते. सर्वांच्या सर्व विद्यार्थी उत्तीर्ण होऊन उत्कृष्ट निकालाची परंपरा याही वेळी दिसून आली.

आडेप वेद संतोष ९७.२०%, पालवे श्रेयस नारायण ९६.२०%, समर्थ राहुल गागरे ९५.६०%, गोरे प्राजक्ता भागवत ९४.६०%, टापरे सई अमित ९४.६०%, भुसा प्रज्वल गणेश ९३.८०%, देशपांडे दिव्येन शैलेश ९३.८०%, दयानदन गणेश सुभाष ९३.६०%, सय्यद फरहान कय्युम ९२.८०%, दोमल अमोघ श्रीनिवास ९०.६०%, गरुड प्रणाली अविनाश ८८.२०%, लुनावत ऋषभ उल्हास ८७.२०% गुण मिळवले. या यशामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल होईल, अशी अपेक्षा आहे.

यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व सत्कार सोहळा महर्षी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष अशोक कानडे, विद्यालयाचे एज्युकेशन डायरेक्टर नंदकिशोर भावसार, कु. सानिया कानडे, विद्यालयाच्या प्राचार्या सौ. तनुजा लोंढे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी विद्यालयातील शिक्षिका सौ. सोनाली वाणी, सौ. स्नेहल महाजन, सौ. प्रज्ञा भागवत, सौ. प्रिया मल्होत्रा, सौ. तंझिला शेख, प्रसाद पाटोळे, श्रीकांत सोनटक्के, राजेश मुंडीवाले, सौ. योगिता सोनकुसरे, कु. निलेश्वरी शर्मा उपस्थित होत्या.

## अहमदनगर उर्दू हायस्कुल दहावीचा ९३ टक्के निकाल

नगर - नागोरी मुस्लिम मिसगर जामत ट्रस्टच्या अहमदनगर उर्दू हायस्कुलचा दहावीचा निकाल ९३ टक्के लागला. हायस्कूल मध्ये प्रथम क्रमांक अन्सारी आयेशा राफिउल्ला ७३.८०%, द्वितीय शेख फातेमा समीर ७२.४०% तर तृतीय शेख अर्शिया तौसीफ ७१.४०% टक्के गुण प्राप्त केले.

एस.एस.सी. मार्च २०२५ मध्ये उतुंग यश संपादन केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मिसगर ट्रस्ट व बोर्ड ऑफ ट्रस्टच्या वतीने अध्यक्ष युनुस सुलतान तांबटकर, सचिव इमरान शफी अहमद शेख, खजिंनदार इमरान जमीर खान विश्वस्त फरहान खालीद खान व नवीद तांबटकर इतर बोर्ड ऑफ ट्रस्टीजनी शुभेच्छा दिल्या.

# दामोदर विधाते माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे दहावी बोर्डाच्या परीक्षेत यश

**९२ टक्के घेऊन पूजा निवडूंगे शाळेत प्रथम**


पूजा निवडुंगे | कार्तिकी आरे | प्रेम मिसाळ

नगर - सारसनगर येथील जनकल्याण शिक्षक प्रसारक मंडळ संचलित कै. दामोदर विधाते (मास्तर) माध्यमिक विद्यालयाचे इयत्ता दहावी बोर्डाच्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्कृष्टपणे गुण मिळवून यश संपादन केले. शाळेचा ८९.१३ टक्के निकाल लागला.

विद्यालयाच्या गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक- पूजा किशोर निवडूंगे (९२ टक्के), द्वितीय क्रमांक- कार्तिकी नागेश आरे (९१.८० टक्के), तृतीय- प्रेम सुनिल मिसाळ (८४.२० टक्के) क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा बहुमान पटकाविला आहे.

विद्यालयातील ८ विद्यार्थी विशेष प्राविण्य श्रेणीत, ७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत व १८ विद्यार्थी द्वितीय तर ८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.दहावीच्या विद्यार्थ्यांना सारिका गायकवाड, अमोल मेहेत्रे, सचिन बर्डे यांचे मार्गदर्शन लाभले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे संस्थेचे विश्वस्त बाळासाहेब (अण्णा) विधाते, रामदास कानडे, संस्था सरचिटणीस प्रा. शिवाजी विधाते, विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष सुसे, प्राथमिकचे मुख्याध्यापक शिवाजी म्हस्के यांनी अभिनंदन केले.

## यशवंत गाडे विद्यालयात मुलींनीच मारली बाजी

नगर - फकिरवाडा मुकुंदनगर येथील यशवंत गाडे विद्यालयात दहावीच्या परीक्षेत मुलींनी बाजी मारली. विद्यालयाचा निकाल ८९.४ टक्के लागला असुन बुशरा आरिफ शेख ८८.६० टक्के मिळवुन प्रथम, आर्शिन रफिक पटेल ८३.६० टक्के मिळवुन दुसरी आली. तर अमान अमीर शेख ८१.२० टक्के मिळवुन तिसरा आला. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत गाडे, सचिव प्रा. शशिकांत गाडे, सहसचिव रमाकांत गाडे, उपाध्यक्ष एम.पी. कचरे, खजिनदार संजय गाडे, संचालक ज्ञानदेव पांडुळे, रामचंद्र दिघे, आसाराम म्हस्के, मुख्याध्यापिका संगिता बनकर व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.

# आठरे पाटील पब्लिक स्कूलचा १०० टक्के निकाल; शाळेचे ९६% विद्यार्थी विशेष व प्रथम श्रेणीत उत्तीर्ण


कु. तनिष्का वाघ | कु. प्राजक्ता कराळे | चि. जिज्ञेश देशमुख

नगर - पुणे विभागीय शिक्षण मंडळातर्फे इयत्ता १० वी (एस.एस.सी) फेब्रुवारी/मार्च - २०२५ या बोर्ड परीक्षेत अ. नगरच्या सावेडी विभागातील वडगाव गुप्ता रोड वरील आठरे पाटील पब्लिक स्कूल अँड ज्यूनियर कॉलेज या इंग्रजी माध्यमाच्या वसतिगृहात्मक शाळेच्या विद्यार्थ्यांनी राज्यात सर्वोत्कृष्ट १००% उज्वल निकालाची परंपरा यावर्षीही कायम राखली.

शाळेच्या एकूण ९४ प्रविष्ठ विद्यार्थ्यांपैकी ४९ (५२.१२%) विद्यार्थी विशेष श्रेणीत तर ४१ (४३.६१%) विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर द्वितीय श्रेणीत ०४ (४.२५%) विद्यार्थी उत्तीर्ण झाले. एकूण ९४ प्रविष्ठ विद्यार्थ्यांपैकी ११ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षाही अधिक गुण प्राप्त केले.

शाळेची विद्यार्थिनी कु. वाघ तनिष्का राजेश ९३.६०% गुण मिळवून प्रथम, कु. कराळे प्राजक्ता मच्छिंद्र ९३.४०% गुण मिळवून व्दितीय, तर शाळेचा विद्यार्थी चि. देशमुख जिज्ञेश अनंत या विद्यार्थ्याने ९३.२०% गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक मिळविला.

शाळेच्या आतापर्यंत एकूण ३६ बॅचेसमध्ये उत्तीर्ण झालेले विद्यार्थी असे एकूण ३२०९ विद्यार्थ्यांपैकी १४७९ (४६.०८%) विद्यार्थी विशेष श्रेणीत, १२६९ (३९.५४%) विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहेत. तर ३७० (११.७४%) विद्यार्थी व्दितीय श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहेत.

सदर आकडेवारीवरून महाराष्ट्र स्टेट बोर्डच्या पॅटर्नमध्ये निकालात वर्चस्व राखणारी एकमेव आदर्श शाळा आहे. नर्सरी ते अकरावीपर्यंतच्या या निवासी व अनिवासी मुला-मुलींच्या वसतिगृहात्मक, शैक्षणिक सुविधांनी परिपूर्ण अशा इंग्रजी माध्यमाच्या शाळेत विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची रुची वाढावी या करीता इ. ५ वी व इ. ८ वी साठी शिष्यवृत्ती परीक्षा, शासकीय चित्रकला परीक्षा, हिंदी राष्ट्रभाषा बहिस्थः परीक्षा, गणित, विज्ञान, संगणक, ऑलम्पियाड परीक्षा, एम.टी. एस., एन.टी.एस. इ. स्पर्धा परीक्षांचे आयोजन केले जाते.

१३ जुलै १९८७ रोजी स्थापन झालेल्या या शाळेस सर्वोत्कृष्ट निकालाची ३६ वर्षाची वैभवशाली परंपरा लाभलेली आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास होण्यासाठी शालेय अभ्यासाबरोबरच २५ प्रकारचे देशी व विदेशी क्रीडा प्रकारांचेही प्रशिक्षण दिले जाते.

उज्वल यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा डॉ. अंजली आठरे पाटील, कार्यकारी विश्वस्त डॉ. अनिल आठरे पाटील, सर्व विश्वस्त, प्राचार्य, मुख्याध्यापक, समन्वयक व सर्व शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

# प्रगत विद्यालयाचा शालान्त परीक्षेचा निकाल ९०.१२ टक्के


दिकोंडा श्रद्धा | माळवे धनश्री | पवार रागिनी | संबळे कृष्णा

नगर - येथील दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा शालांत परीक्षेचा निकाल ९०.२२ % लागला असून विद्यालयामध्ये प्रथम क्रमांक कु. दिकोंडा श्रद्धा गणेश ८८.४० %, द्वितीय क्रमांक कु. माळवे धनश्री कानिफनाथ ८५.८० %, तृतिय क्रमांक कु. पवार रागिनी शरद ८५.६० तर मुलांमध्ये चि. संबळे कृष्णा संतोष ८२ ८० % विद्यार्थी प्रथम आले असून डिस्टिकशन मध्ये ०९ विद्यार्थी फर्स्ट क्लास मध्ये २१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

त्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्रीमती विजया रेखे, माजी अध्यक्ष दि. ना. जोशी, उपाध्यक्ष चंद्रशेखर कुलकर्णी, सेक्रेटरी किरण वैकर, खजिनदार व प्रगत विद्यालयाचे चेअरमन उमेश रेखे, कार्यकारणी सदस्य महेश चंद्रकांत रेखे व उदय भणगे, ॲड. रमेश नगरकर, प्राचार्य सुनिल पंडित, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका विद्या खडके व सर्व शिक्षक शिक्षकेतर वृंदानी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# वाल्मिकी रामायणाचा चिकित्सकपणे अभ्यास करण्याची आवश्यकता

## विक्रम एडके यांचा विश्वास



अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात आयोजित वसंत व्याख्यानमालेच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा ग्रंथालय निरीक्षक रामदास शिंदे, विश्वास साहित्यिक व अभ्यासक नगरचे पुत्र विक्रम एडके, वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, उपाध्यक्ष दिलीप पांढरे, अनंत देसाई, संचालिका प्रा. ज्योती कुलकर्णी, समन्वयक शिल्पा रसाळ, संचालक किरण आगरवाल, ग्रंथपाल अमोल इथापे, सहा. ग्रंथपाल नितीन भारताल आदि. (छाया – सुरेश मैड)

### अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वसंत व्याख्यानमालेचे उद्‌घाटन

नगर – भारतासारखा प्राचीन संस्कृतीचा वारसा जगाला देशात अनेक महान ग्रंथांची परंपरा आहे. परंपरेने चालत आलेले महाभारत आणि वाल्मिकी रामायण हे खऱ्या अर्थाने तात्कालीन परिस्थितीशी साधर्म्य सांगणारे ग्रंथ आहेत. आपण या महान ग्रंथांचे केवळ वाचन न करता चिकित्सकपणे अभ्यास केल्यास आपल्याला अनेक आश्चर्यकारक गोष्टी समजतील व आपली त्यातील गोडी वाढत राहील असा विश्वास साहित्यिक व अभ्यासक नगरचे पुत्र विक्रम एडके यांनी व्यक्त केले.

अहिल्यानगर जिल्हा वाचनालयात आयोजित वसंत व्याख्यानमालेच्या उद्‌घाटनप्रसंगी अपरिचित रामायण या विषयावर पहिले पुष्प गुंफताना ते बोलत होते. याप्रसंगी उद्‌घाटक म्हणून जिल्हा ग्रंथालय निरीक्षक रामदास शिंदे, वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, उपाध्यक्ष दिलीप पांढरे, अनंत देसाई, संचालिका प्रा. ज्योती कुलकर्णी, समन्वयक शिल्पा रसाळ, संचालक किरण आगरवाल, ग्रंथपाल अमोल इथापे, सहा. ग्रंथपाल नितीन भारताल उपस्थित होते.

प्रमुख वक्ते विक्रम एडके यांनी उपस्थित नगरकरांशी संवाद साधताना परंपरेने चालत आलेले वाल्मिकी रामायण तत्कालीन परिस्थितीशी साधर्म्य साधणारे आहे. यामधील असणाऱ्या अयोध्या, पंचवटी, लंका, यासारखी दिलेली ठिकाणी आजही आपल्यासमोर उभी आहेत. याचा डोळसपणे अभ्यास करायला हवा असे प्रतिपादन केले.

रामायणातील अनेक घटनांचा संदर्भ देत एडके यांनी त्या घटनेमागील असणारी परिस्थिती, मानसिकता, व्यक्तिविशेष अशा वेगवेगळ्या अंगाने त्याची चिकित्सक माहिती देऊन अपरिचित रामायणव त्यामधील घटना पाहण्याचा वेगळा दृष्टिकोन उपस्थिताना दिला .

व्याख्यानमालेचे उद्‌घाटक रामदास शिंदे यांनी व्याख्यानमालेला शुभेच्छा देऊन अहिल्यानगर जिल्हा वाचनालय सातत्याने आदर्श समाज निर्मिती करण्यात व नगरकरांची वाचन संस्कृती, कला, साहित्य, संवाद यांची भूक भागविण्यास करत असलेल्या प्रयत्नांचे कौतुक केले.

कार्यक्रमाच्या प्रस्ताविकात प्रा. शिरीष मोडक यांनी जिल्हा वाचनालयाच्या वसंत व्याख्यानमालेस मोठी परंपरा आहे. रसिक नगरकर आतुरतेने वाट पाहत असलेल्या या व्याख्यानमालेच्या याही वर्षी त्यांची ज्ञानलालसा भागवली जाईल असा आशावाद व्यक्त केला. मान्यवरांचे स्वागत प्राध्यापक मोडक व किरण अग्रवाल यांनी केले. परिचय व्याख्यानमालेच्या समन्वय शिल्पा रसाळ, सूत्रसंचालन प्राध्यापक ज्योती कुलकर्णी तर आभार दिलीप पांढरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व संचालक, तसेच ग्रंथपाल अमोल इथापे, सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल, पल्लवी कुक्कडवाल, संकेत फाटक, सौ. वर्षा जोशी, संजय गाडेकर, निखिल ढाकणे, सिकंदर शेख यांचे सहकार्य लाभले.

# नगरमध्ये वीज वाहक तार तुटून अंगावर पडल्याने गाईचा मृत्यू



वीज वाहक तार तुटून अंगावर पडल्याने मृत्युमुखी पडलेली गाय छायाचित्रात दिसत आहे.

नगर – शहरातील प्रभाग क्र. २ मधील डोकेनगर भागामध्ये वीज वाहक तार तुटून जमिनीवर कोसळल्याने एक गाय त्यामध्ये मृत्युमुखी पडली असून गाईच्या मालकाला विद्युत विभागाने भरपाई द्यावी अशी मागणी माजी नगरसेवक निखिल वारे यांनी केली आहे.

अहिल्यानगर शहरातील प्रभाग क्रमांक दोन वसाहतीमध्ये विजेच्या तारा अगदी घराजवळून गेल्या आहेत. त्यामुळे पावसाळ्यात शॉर्टसर्किटचा किंवा विजेचा धक्का लागून एखादी मोठी घटना घडण्याची शक्यता असल्याकारणाने माजी नगरसेवक निखिल वारे यांनी विद्युत विभागाकडे वेळोवेळी पाठपुरावा केला तरी देखील विद्युत विभागाने नगरसेवकांच्या मागणीकडे लक्ष दिले नाही.

विद्युत विभागाने याकडे दुर्लक्ष केल्याने दोन दिवसापूर्वीच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना देखील निवेदन देऊन विद्युत विभागांना सूचना करून या वीजवाहक तारा दुरुस्त करण्याची मागणी निखिल वारे यांनी केली आहे.

# वह्यांची कोरी पाने जमा करा व गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात द्या



नगर – नवीन शैक्षणिक वर्षाला जूनमध्ये सुरुवात होत आहे. यानिमित्त व्यवसाय संभाळतांनाच सामाजिक बांधिलकी म्हणून आम्ही हा उपक्रम राबविणार आहे. गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी अभिनव उपक्रमाची घोषणा केली आहे. यात विद्यार्थ्यांनी आपल्या जुन्या वह्यातील कोरी पाने जमा करायची आहेत. या कोऱ्या पानांना व्यवस्थित बायंडींग करून त्या वह्या शाळा सुरु होताच गरजू विद्यार्थ्यांना वितरित केल्या जाणार आहेत. पूर्ण रद्दी देण्याऐवजी फक्त कोरी पानेच बाजूला काढून ती देण्याचे आवाहन सेंटर ललित बनभेरु यांनी केले आहे.

शिक्षण हा प्रत्येकाच्या आयुष्यातील महत्त्वाचा भाग आहे. शासनाकडून शाळांमध्ये पाठ्यपुस्तके मोफत दिली जात असली तरी वह्या तसेच इतर शैक्षणिक साहित्य घेणे अनेकांना आर्थिकदृष्ट्या शक्य होत नाही. अनेकवेळा नव्या घेतलेल्या वह्या वार्षिक परीक्षा संपल्यानंतरही संपत नाही. अनेक पाने कोरीच असतात व ती रद्दीत जातात. या कोऱ्या पानांचा सदुपयोग होण्यासाठी आम्ही हा पुढाकार घेतला आहे. फक्त कोरी पाने जमा करून आपण एका गरजूच्या शिक्षणात खारीचा वाटा उचलू शकतो. आमच्याकडून सर्व कोऱ्या पानांपासून बायंडींग करून वह्या केल्या जाणार आहेत. याशिवाय चित्रकला वह्यांचे कोरे पानही विद्यार्थी जमा करू शकतील. त्यापासूनही चित्रकला वह्या तयार केल्या जातील. रंगाचे नवीन साहित्य घेणार असल्यास जुने चांगल्या स्थितीतील कलर, ब्रश असे साहित्यही जमा करता येईल. वह्यांची कोरी पाने नवीपेठ येथील ओम चाट सेंटर येथे सायंकाळी ६ ते रात्री १० यावेळेत जमा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# नावीन्यपूर्ण उपक्रमातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायद्याची राज्यभरातील जनमानसात व्यापक स्वरूपात जागृती करा : आयुक्त चित्रा कुलकर्णी



पंचायत समिती सभागृह, राहुरी येथे श्रीरामपूर व राहुरी तालुकास्तरीय प्रमुख अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना राज्य सेवा हक्क आयोगाच्या आयुक्त चित्रा कुलकर्णी.

नगर – जनतेला पारदर्शकपणे व विहित कालावधीमध्ये सेवा मिळावी यासाठी अधिकाऱ्यांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवत लोकसेवा हक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत जनमानसात कायद्याची अधिक व्यापक स्वरूपात जागृती करण्याचे निर्देश राज्य सेवा हक्क आयोगाच्या आयुक्त चित्रा कुलकर्णी यांनी दिले.

पंचायत समिती सभागृह, राहुरी येथे श्रीरामपूर व राहुरी तालुकास्तरीय प्रमुख अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत श्रीमती कुलकर्णी बोलत होत्या. यावेळी आयोगाचे उपसचिव सुनिल जोशी, सहायक कक्ष अधिकारी प्रशांत घोडके, महाआयटीचे महाव्यवस्थापक संतोष खैरनार, श्रीरामपूरचे तहसीलदार मिलिंदकुमार वाघ, राहुरीचे तहसीलदार नामदेव पाटील, गटविकास अधिकारी सुधाकर मुंढे, प्रशांत सिनारे, नायब तहसीलदार संध्या दळवी आदी उपस्थित होते.

श्रीमती कुलकर्णी म्हणाल्या, जनतेला पारदर्शक, गतीमान आणि दिलेल्या कालमर्यादेत माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन अधिक प्रभावीपणे ऑनलाईन सेवा देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क कायदा करण्यात आला आहे. शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांनी कायद्याचा सखोल अभ्यास करत जनतेला विहित वेळेत सेवा देण्यासाठी संवेदनशीलतेने काम करावे. या कायद्याच्या अंमलबजावणीने प्रशासन अधिक गतीमान आणि पारदर्शक होण्यास मदत होणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

शासकीय नोकरी म्हणजे जनसेवेचे एक माध्यम आहे. लोकसेवक म्हणून काम करत असताना प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्यांनी जनहिताच्या भावनेने सर्वसामान्यांना सेवा द्यावी. सेवा देताना नागरिकांची कुठल्याही प्रकारची अडवणूक होणार नाही याची खबरदारी घेण्याच्या सूचनाही आयुक्त श्रीमती कुलकर्णी यांनी दिल्या.

शासनाच्या विविध विभागांच्या सेवा वेगवेगळ्या पोर्टलवरून देण्यात येतात. या सर्व पोर्टलचे एकत्रीकरण करून आपले सरकार केंद्रावरून सेवा देण्यासाठी शासन आग्रही आहे. गुड गव्हर्नन्समध्ये आपले राज्य देशात अग्रेसर राहावे यासाठी राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी आग्रही भूमिका घेतली असून ऑनलाईन सेवा न देणाऱ्या विभागाच्या प्रमुखांना दरदिवशी दंड करण्याचा निर्णयही करण्यात आला आहे. त्यामुळे प्रत्येकाने गांभीर्यपूर्वक कायद्याची अंमलबजावणी करावी. कायद्याचं महत्त्व, अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या आदी बाबी लक्षात घेऊन काम करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी सुनावणी घेताना सात दिवसांचा वेळ देऊन नोटीस बजवावी. सुनावणीसाठी अपिलकर्त्यासोबतच पदनिर्देशित अधिकाऱ्यांनी बोलावण्यात यावे. संपूर्ण अभिलेख्याची तपासणी करून निष्पक्ष व पारदर्शीपणे निकाल द्यावा. अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे सामान्यांचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

बैठकीस राहुरी व श्रीरामपूर तालुक्यातील सर्व विभागाचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

# आकांक्षा शिंदेचे घवघवीत यश; ९७.२०% गुणांसह शाळेचे नाव उज्वल



नगर – रेसिडेन्शियल हायस्कूलची विद्यार्थिनी आकांक्षा शिंदे हिने दहावीच्या परीक्षेत ९७.२०% गुण मिळवत यश संपादन केले आहे.

आकांक्षाच्या या यशामागे तिच्या शाळेतील शिक्षकांचे तसेच वडील राजकुमार शिंदे, आई प्रमिला शिंदे आणि मोठी बहीण समीक्षा शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. अभ्यासात सातत्य ठेवत तिने दररोज सहा ते सात तास परिश्रम घेतले.

आपले ध्येय गाठताना आकांक्षाने तथागत भगवान गौतम बुद्ध, थोर समाजसुधारक महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवला. त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन तिने अथक मेहनत घेतली.

# धरणातील गाळ काढण्यासाठी राज्याचे सर्वसमावेशक धोरण करा

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे प्रतिपादन; मुळा प्रकल्पाचा गाळ काढण्याच्या प्रायोगिक मोहीमेत समावेश



धरणातील गाळ काढण्याच्या प्रायोगिक मोहिमेत अहिल्यानगर जिल्ह्यातील मुळा धरणाचा समावेश करण्यात आला आहे. मंत्रालयातील बैठकीत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी माहिती दिली.

नगर – धरणातील गाळ काढण्याबाबत इतर राज्यांच्या धोरणांची महाराष्ट्राच्या धोरणाशी तुलना करून राज्याचे सर्वसमावेशक नवीन धोरण तयार करावे, अशा सूचना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. या प्रायोगिक मोहिमेत अहिल्यानगर जिल्ह्यातील मुळा धरणाचा समावेश करण्यात आला आहे, असेही त्यांनी सांगितले.

मंत्री विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात धरणातील गाळ काढण्याकामी करावयाच्या कार्यवाहीबाबतची सद्यस्थिती तसेच वाळू व माती विलगीकरणासंबंधी तंत्रज्ञानाबाबत बैठक आयोजित करण्यात आली. बैठकीस मुख्यमंत्री यांचे मुख्य आर्थिक सल्लागार तथा ‘मित्रा’चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, सचिव संजय बेलसरे, कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक अतुल कपोले, मुख्य अभियंता तथा सहसचिव संजीव टाटू व जलसंपदा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री विखे पाटील म्हणाले, महाराष्ट्र राज्याने धरणातील गाळ काढण्यासाठी तयार केलेले धोरण सुधारित करताना देशातील इतर राज्यांनी स्वीकारलेल्या बाबी राज्याच्या नवीन धोरणात समाविष्ट करण्यासाठी सखोल व तुलनात्मक अभ्यास करून त्याचा अहवाल एक आठवड्यात सादर करावा.

मंत्री विखे पाटील यांनी सांगितले की, राज्य शासनाने धरणातील गाळ काढण्यासाठी राज्यातील ६ प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर निश्चित केले आहेत. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील उजनी, नाशिक जिल्ह्यातील गिरणा, भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जायकवाडी, अहिल्यानगर जिल्ह्यातील मुळा व जळगाव जिल्ह्यातील हातनूर प्रकल्पांचा समावेश आहे. या धरणांमधील गाळ काढण्याचा अनुभव लक्षात घेऊन राज्यातील इतर धरणांतील गाळ काढण्याची प्रक्रिया राबविली जाणार आहे.

गाळ काढण्यापूर्वी प्रत्येक ठिकाणची भौगोलिक रचना समजून घेणे आवश्यक आहे. केवळ गाळावर नव्हे, तर या ठिकाणी असलेल्या वाळूवरही लक्ष केंद्रित करावे. गाळ काढण्याची जबाबदारी संबंधित महामंडळांनी पार पाडावी. निविदा प्रक्रियेपूर्वी सखोल सर्वेक्षण करून वाळू व गाळाचे प्रमाण निश्चित करावे. स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया राबविताना विधी व न्याय विभागाचे अभिप्राय, पर्यावरण मान्यता व इतर सर्व वैधानिक बाबींची पूर्तता संबंधित महामंडळांनी त्यांच्या स्तरावर करावी, अशा सूचनाही मंत्री विखे पाटील यांनी बैठकीत दिल्या.

# कु. राधिका सागडे हिला दहावीच्या परीक्षेत ९३ टक्के गुण



नगर – येथील भाऊसाहेब फिरोदिया प्रशालेतील विद्यार्थिनी कु. राधिका नागेश सागडे हिने १० वी ला ९३ टक्के गुण घेऊन विशेष प्रविण्यासह उत्तीर्ण झाली आहे. तिला तिचे वडील नागेश उर्फ बाळासाहेब सागडे व आई सौ. वैजयंती सागडे यांचे त्याचबरोबर शाळेतील सर्व शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले आहे.

विशेष बाब म्हणजे संस्कृत या विषयामध्ये तिला १०० पैकी ९९ गुण प्राप्त झाले आहेत. राधिका हिने अत्यंत जिद्द चिकाटीने रात्रंदिवस मेहनत घेऊन दहावीत यश संपादन केले. या यशाबद्दल तिचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. कोर्ट गल्लीतील श्री स्वामी समर्थ मेडीकल स्टोअर्सचे संचालक नागेश सागडे यांची ती कन्या आहे.

# अरुणकाका जगताप यांना श्रद्धांजली वाहताना सभागृह झाले भावूक

## भावनिक वातावरणात शोकसभा



माजी आमदार अरुणकाका जगताप यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी बुधवारी झालेल्या शोकसभेत आध्यात्मिक क्षेत्रातील धर्मगुरुंच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले.

नगर – दिवंगत माजी आमदार अरुणकाका जगताप यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी बुधवारी शोकसभेचे आयोजन येथील अहिल्यानगरच्या यशवंतराव चव्हाण सहकार सभागृहात करण्यात आले होते. नगर शहरासह जिल्ह्यातील सर्वच क्षेत्रातील व्यक्तींनी शोकसभेस उपस्थिती लावून अरुणकाकांच्या स्मृतींना उजाळा दिला. उपस्थित सर्वचजण भावना व्यक्त करताना भावूक झाले. काकांच्या निधनाने मोठी पोकळी निर्माण झाली असून पालकत्व गमावले असल्याच्या भावना उपस्थित बहुतांशांनी व्यक्त केल्या. यावेळी एलईडी स्क्रीनवर दाखवण्यात आलेली काकांच्या जीवनावरील ध्वनी चित्रफित पाहून अनेकांना गहिवरून आले. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन जगताप व आ.संग्राम जगताप यांची उपस्थितांनी भेट घेऊन संवेदना व्यक्त केल्या.

यावेळी ह.भ.प. आदिनाथशास्त्री महाराज, ह.भ.प. बद्रीनाथ तनपुरे महाराज, मंदारबुवा रामदासी, रमाकांत व्यास महाराज, ह.भ.प. पुंडलिकशास्त्री जंगले महाराज, ह.भ.प. उद्धव मंडलिक महाराज, जैन मुनी आलोकऋषीजी महाराज, ह.भ.प. रामदास क्षीरसागर महाराज, पास्टर दीपक पाडळे, महानुभाव पंथाचे शाम बिडकर महाराज आदी आध्यात्मिक क्षेत्रातील धर्मगुरूंच्या उपस्थितीत अरुणकाका जगताप यांच्या प्रतिमेस अभिवादन करून सामूहिक श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी सर्व राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सर्व क्षेत्रांमधील व्यक्ती उपस्थित होते.

यावेळी बद्रीनाथ तनपुरे महाराज म्हणाले, जगावे तर काकांसारखे मरावे तर काकांसारखेच असे आदर्श जीवन अरुणकाका जगले. ग्रामीण भागातून शहरात आलेल्या प्रत्येकासाठी आधार देत. असा अलौकिक आपलेपणा काकांमध्ये होता. त्यांचा वारसा सचिन जगताप व संग्राम जगताप पुढे नेतील.

पुंडलिकशास्त्री जंगले महाराज म्हणाले, वारकरी संप्रदाय जपत कायम दिंड्यांना सहकार्य करण्याचा वारसा अरुणकाकांनी पुढे चालवला. आता त्यांच्यानंतर दोन्ही मुलेही हा वारसा पुढे नेतील.

मंदारबुवा रामदासी म्हणाले, अरुणकाकांनी आपले पूर्ण जीवन लोकहितासाठी वेचले. त्यामुळे त्यांच्या निधनानंतर त्यांचे हे कार्य पुढे नेण्यासाठी आ.संग्राम जगताप व सचिन जगताप यांना सर्वांनी सहकार्य करावे.

अलोकऋषीजी म्हणाले, अरुणकाकांनी समाज जोडण्याचे मोठे काम करून आदर्श निर्माण केला. त्यांच्या या चांगल्या कामाचे अनुकरण सर्वांनी करावे. संग्राम जगताप व सचिन जगताप त्यांच्या पायावर पाऊल टाकून समाजकार्य करत आहेत.

पास्टर दीपक पाडळे म्हणाले, अरुणकाकांनी शहरातील ख्रिस्ती समाजाचे अनेक प्रश्न मार्गी लावले. दफनभूमीसाठी जागा उपलब्ध करून देत त्यांनी मोठे सहकार्य समाजाला केले होते.

आ.मोनिका राजळे म्हणाल्या, २०१२ साली मी जिल्हा परिषदेची सदस्य झाले तेव्हापासून काकांचे मोलाचे मार्गदर्शन मला लाभले. तसेच मतदारसंघासाठी मोठा निधीही त्यांनी उपलब्ध करून दिला.

रा.स्व.संघाचे प्रांत संघचालक नानासाहेब जाधव म्हणाले, अरुणकाका बालपणी वाडियापार्क येथील संघाच्या शाखेत नित्याने येत असत. त्यामुळे त्यांना बालपणापासूनच राष्ट्रसेवेचे व लोकसेवेचे बाळकडू मिळाल्याने आयुष्यभर समर्पित जीवन जगत गोसेवाही केली.

पद्मश्री पोपटराव पवार म्हणाले, सध्याचे राजकारणात द्वेष वाढत आहेत. पण अरुणकाकांनी कधीही द्वेषाने राजकारण केले नाही. तर विरोधकांनाही आपलेसे करून घेतले. त्यांच्या स्मरणार्थ येत्या वर्षात ६६ हजार झाडे लाऊन संगोपन करण्याचा संकल्प सर्वांनी करावा, असे आवाहन केले.

नरेंद्र फिरोदिया म्हणाले, अरुणकाकांनी सर्व क्षेत्राला राजाश्रय देत मोठे सहकार्य केले. आज त्यांच्या निधनाने हे सर्व क्षेत्र पोरके झाले असून मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

दादा कळमकर म्हणाले, मी व अरुणकाका अनेक निवडणुका विरोधात लढलो पण कधीही आमच्यात कटुता आली नाही. त्यांना विधान परिषदेचे आमदार होण्यासाठी मी मदत केली तर अभिषेकला महापौर होण्यासाठी काकांनी मला मदत केली होती. त्यांच्यावर जनतेचे केव्हढे प्रेम होते ते विराट अंत्ययात्रेने सर्वांना दिसले आहे.

आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी प्रास्ताविकात काही सूचना करून काकांनी सर्वांवर प्रेम केले व सर्वांनीच काकांवर प्रेम केले आहे. या प्रेमापोटीच आज येथे मोठ्या संख्येने जनसमुदाय जमला आहे, असे सांगितले.

डॉ. सुजय विखे म्हणाले अरुणकाकांचे कार्य एका शोकसभेमध्ये व्यक्त होणे अशक्यच आहे. प्रत्येकाला भावना व्यक्त करायच्या आहेत. यासाठी लवकरच काकांच्या जीवनावर एक परिपूर्ण पुस्तक करण्याच्या कामास सुरुवात करणार आहोत. काकांच्या वर्षश्राद्धापर्यंत हे पुस्तक आपण सर्व मिळून तयार करू, असे सांगून उपस्थित सर्वांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करून आभार मानले.

यावेळी माजी आमदार बबनराव पाचपुते, डॉ.बापूसाहेब कांडेकर, आरपीआयचे सुनील साळवे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ, हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोडक, प्रताप ढाकणे, विनायक देशमुख, भाजपाचे महेंद्र गंधे, माजी आमदार पांडुरंग अभंग, चंद्रशेखर घुले, भानुदास मुरकुटे, माधवराव कानवडे, संभाजी कदम, सुमित गायकवाड आदींनी थोडक्यात भावना व्यक्त करून अरुणकाकांना श्रद्धांजली वाहिली. सामुहिक पसायदानाने शोकसभेची सांगता झाली. प्रा. प्रसाद बेडेकर यांनी सूत्रसंचालन केले.

